# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. १ जानेवारी २०२६

किंमत ४ ₹


नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा

# नव्या वर्षाचे जल्लोषात स्वागत

## नवी आशा, नवे संकल्प घेऊन आनंदोत्सव



प्रमोद जाधव
| रायगड |

नवी आशा, नवे संकल्प आणि एक वेगळा उत्साह घेऊन बुधवारी रात्री बारानंतर २०२६ या नव्या वर्षाचे स्वागत करण्यात आले. फटाक्यांची आतषबाजी, हॅप्पी न्यू इअरचा एकच जल्लोष यावेळी ठिकठिकाणी पहावयास मिळाला. अलिबागसह जिल्ह्यातील अनेक समुद्रकिनारी हजारो पर्यटक, स्थानिक तसेच ग्रामीण भागात मोकळ्या मैदानात नागरिक जमून एकमेकांना नव्या वर्षाच्या शुभेच्छा देत होते. सोशल मिडीयावर तर शुभेच्छांचा वर्षाव एकमेकांवर करीत महोत्सव साजरा केला.

सरत्या २०२५ या वर्षाला निरोप देत असताना रात्री बारानंतर नव्या २०२६ या वर्षाचे स्वागत करण्यासाठी अलिबाग, काशीद, वरसोली, मूरूड, रेवदंडा अशा अनेक समुद्रकिनाऱ्यांसह मोकळ्या मैदानात पर्यटक व स्थानिकांची गर्दी झाली होती.

### ग्रामीण भागात पोपटीवर भर

नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी पर्यटकांनी समुद्रकिनाऱ्यांना भर दिली असताना, ग्रामीण भागातही तो क्रेझ दिसून आला. यावेळी अनेक गावांतील तरुणांसह पर्यटकांनी एकत्र येत पोपटीवर ताव मारण्यावर अधिक भर दिला. त्यामुळे एक वेगळा उत्साह या निमित्ताने दिसून आला.

### पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी दाखल झालेल्या पर्यटकांसह स्थानिकांच्या सुरक्षेसाठी रायगड पोलिसांनी रात्रीचा दिवस करून पहारा ठेवला. वर्षपूर्ती निमित्त रायगड जिल्ह्यात दाखल होणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेसाठी पोलीस सज्ज होते. जिल्ह्यामध्ये एक हजारहून अधिक पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. ठिकठिकाणी नाका बंदी करून गैरप्रकार व अवैद्य धंद्यांवर पोलिसांची करडी नजर होती. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई केली जाणार आहे.

थंडीचा कडाका असतानाही त्याकडे दुर्लक्ष करीत पर्यटक नव्या वर्षाच्या स्वागतासाठी रममाण झाले होते. वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम, संगीत सोहळा अशा अनेक प्रकारचे उपक्रम वेगवेगळ्या ठिकाणी राबविण्यात आले. बुधवारी (दि. ३१) सायंकाळी सात वाजल्यापासून त्याची तयारी सुरू झाली.घड्याळ्याच्या काट्याकडे अनेकांचे लक्ष लागून राहिले होते. रात्री उशीरापर्यंत पार्ट्यांनी समुद्रकिनारे, हॉटेल गजबजून गेले होते. तरुण असो, की वृध्द सर्वजण पार्टीमध्ये सहभागी झाले होते.

लहान मुलांसाठीदेखील वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केलेहोते. त्यामध्येदेखील मुलांनी सहभाग घेऊन सरत्या वर्षाला आनंदोमय वातावरण निरोप दिला. थर्टी फर्स्टची तयारी सकाळपासून सुरु होती. चिकन, मटण, तसेच सागरी मासळीवर ताव मारण्यावर अनेकांनी भर दिला. नव वर्षाच्या स्वागतासाठी अनेक ठिकाणी नाईट पार्ट्यांचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यामध्ये एक दिवसीय दारु विक्रीसाठी ४६ जणांना परवाना राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून देण्यात आला. समुद्रकिनाऱ्यांमध्ये एकत्र जमून डिजेच्या तालावर नाचण्यावर अनेकांनी पसंती दर्शविली होती. त्यामुळे संपूर्ण किनारे पर्यटकांनी भरगच्च भरले होते. बाराचा ठोका झाल्यावर हॅप्पी न्यु इअरचा जल्लोष करण्यात आला. रंगबेरंगी फटक्यांनी आकाश उजळून निघाले. प्रत्येकजण एकमेकांना नववर्षाच्या शुभेच्छा देत होता. दरम्यान हा महोत्सव साजरा करीत असताना कोणताही गैरप्रकार घडू नये, यासाठी रायगड पोलिसांनी कंबर कसली होती. प्रत्येकाच्या हालचालीवर पोलीस लक्ष ठेवून होते.


भावपूर्ण श्रध्दांजली

कै. गजानन हिराजी पाटील
(जी. एच. पाटील)



महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियन राज्य उपाध्यक्ष,
रायगड जिल्हा परिषद सेवा निवृत्त कर्मचारी संघटना अध्यक्ष
यांचे हृदय विकाराने दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी निधन झाले
असून जी एच पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली

शोकाकुल :
रायगड जिल्हा परिषद सेवा निवृत्त कर्मचारी संघटना
पदाधिकारी सदस्य रायगड - अलिबाग



Rajsthan Kota's Pioneer Brand of India

BANSAL CLASSES
Ideal for Scholars
KOTA

Get Ready for the
Best Coaching
in the Town !

ADMISSIONS OPEN

BANSAL CLASSES PVT. LTD.
SINCE 1981
YEARS OF EXCELLENCE

Now in ALIBAG

IIT-JEE | NEET | MHT-CET | NDA

11th & 12th
5th To 10th FOUNDATION
SCIENCE ICSE CBSE SSC

- Alibag's New Academic Landmark
- Expert Faculty Pool
- Trusted by Lakhs of Toppers
- Proven Track Record

राजस्थान कोटा येथील तज्ज्ञ व अनुभवी शिक्षक पूर्णवेळ अलिबागेत उपलब्ध !

9403 212121

ISO 9001 : 2008 Certified
GHARAT COACHING CLASSES
Ladder To Success

GHARAT COACHING CLASSES
Gharat Bhavan | Chendhare | Alibag

# रायगडात कॅन्सर व्हॅनद्वारे मोफत तपासणी

## १ ते ३१ जानेवारी दरम्यान कर्करोग तपासणी मोहीम

। रायगड । प्रतिनिधी ।

कर्करोगाचा लवकर शोध लागून वेळेत उपचार मिळावेत, या उद्देशाने जिल्ह्यात १ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत विशेष कर्करोग तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून जिल्ह्यातील नागरिकांनी या मोफत कर्करोग तपासणी मोहीमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांनी केले आहे.

उपसंचालक,आरोग्य सेवा ठाणे यांच्या स्तरावरून जिल्ह्यासाठी कॅन्सर व्हॅन उपलब्ध करून देण्यात येणार असून ए.टी.पी.नुसार ही मोहीम राबविली जाणार आहे. या कॅन्सर व्हॅनसोबत एक स्त्रीरोगतज्ज्ञ, एक दंत शल्यचिकित्सक तसेच एक सहाय्यक परिचारिका उपस्थित राहणार असून प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून गावागावातील नागरिकांची कर्करोग तपासणी करण्यात येणार आहे. एका दिवसात किमान १५० नागरिकांची तपासणी करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. कर्करोगासारख्या गंभीर आजाराबाबत जनजागृती होऊन नागरिकांनी वेळेत तपासणी करून घ्यावी तसेच ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचावी हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

या मोहिमेसाठी डॉ. किर्ती रंगनाथन, वैद्यकीय अधिकारी जिल्हा रुग्णालय अलिबाग, डॉ. श्रेया पाटील, वैद्यकीय अधिकारी जिल्हा रुग्णालय अलिबाग, डॉ. ऋषीकेश कुलकर्णी वैद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय महाड, डॉ. रामदास तारपेवाड वैद्यकीय अधिकारी उप जिल्हा रुग्णालय माणगाव, डॉ. कृष्णा सोनावणे वैद्यकीय अधिकारी जिल्हा रुग्णालय अलिबाग, डॉ. अश्विनी सोनावले वैद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय चौक, डॉ. स्वाती नाईक वैद्यकीय अधिकारी उप जिल्हा रुग्णालय पनवेल, डॉ. भानुदास गिरी, वैद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय महाड, डॉ. नविना ठाकूर, दंतशल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय अलिबाग, डॉ. झापकर, दंतशल्यचिकित्सक, ग्रामीण रुग्णालय उरण, डॉ. प्रद्युम्न ठोंबरे दंतशल्यचिकित्सक, ग्रामीण रुग्णालय महाड, डॉ. ऋतुजा माळी, दंतशल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय अलिबाग, डॉ. गणेश मेंगाळ, दंतशल्यचिकित्सक, उप जिल्हा रुग्णालय कर्जत, डॉ. सायली बेलगे, दंतशल्यचिकित्सक, उप जिल्हा रुग्णालय पनवेल, डॉ. शेखर वानखेडे, दंतशल्यचिकित्सक, ग्रामीण रुग्णालय मुरुड, डॉ. अम ोल नगराळे, दंतशल्यचिकित्सक, उप जिल्हा रुग्णालय पेण, डॉ. राजन यादव, दंतशल्यचिकित्सक, ग्रामीण रुग्णालय चौक, डॉ. अतुल देशमुख, दंतशल्यचिकित्सक, ग्रामीण रुग्णालय कशेली, अनिकेत गोसावी, अधिपरिसेवक जिल्हा रुग्णालय अलिबाग, प्रियंका माने, अधिपरिसेविका जिल्हा रुग्णालय अलिबाग, हर्षा राऊत, सहायक परिचारीका भाल, प्रणाली माळी, सहायक परिचारीका वाघोली, शिल्पा ठाकुर, सहायक परिचारीका कोर्लई, सिमा बारकुल, सहायक परिचारीका तळा, ज्योती महाडिक, सहायक परिचारीका नेवरुळ, गितांजली पाटील, सहायक परिचारीका पाभरे, लतिका भांगोजी, सहायक परिचारीका दिघी, मनीषा मोरे, अंजली जांधव, सहायक परिचारीका टोल, सुगंधा ढवळे, सहायक परिचारीका वरंध, जयश्री वाघमारे, सहायक परिचारीका निझामपूर ,सविता पेढवी, सहायक परिचारीका साई, अपर्णा मखर, सहायक परिचारीका धाटाव, स्नेहल चांदोरकर, अधिपरिचारीका रोहा, दर्शना पाटील, सहायक परिचारीका जांभूळपाडा, काशी वाघ, सहायक परिचारीका आराव, हर्षदा पाटील, सहायक परिचारीका आमटेम, भावना महाले, सहायक परिचारीका अंजप, ज्योती ओव्हाळ, अधिपरिचारीका कर्जत, सुवर्णा मोरे, सहायक परिचारीका होणंद, अर्चना चव्हाण, सहायक परिचारीका वडखळ, संजना सोनावणे, सहायक परिचारीका अजिवली, अमृता ढाकणे, सहायक परिचारीका पोयंजे, सुप्रिया वाडकर, सहाय्यक परिचारीका, जासई, मोनाली पाटील, अधिपरिचारीका उरण सेवा देण्यासाठी उपलब्ध राहणार आहेत. याशिवाय अनिकेत गोसावी, प्रियंका माने आदी परिचारिकांचा समावेश आहे.

## जर्मन बेकरी बॉम्बस्फोट आरोपीवर गोळीबार

**श्रीरामपूर :** पुण्यातल्या जर्मन बेकरी स्फोटातील आरोपीवर गोळीबार झाल्याची घटना घडली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथे ही घटना घडली. बंटी जहागिरदार असं या आरोपीचं नाव आहे. दुचाकीवरुन आलेल्या दोघांनी त्याच्यावर गोळ्या झाडल्या. १३ फेब्रुवारी २०१० रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या दरम्यान पुण्यातील कोरेगाव पार्क परिसरातील प्रसिद्ध जर्मन बेकरीमध्ये भीषण बॉम्बस्फोट झाला होता. संपूर्ण देशाला हादरवून टाकणारा हा एक मोठा दहशतवादी हल्ला होता. या स्फोटात एकूण १८ लोकांचा मृत्यू आणि ६० हून अधिक जण जखमी झाले होते. इंडियन मुजाहिद्दीन या दहशतवादी संघटनेने लष्कर-ए-तैयबाच्या मदतीने हा स्फोट घडवून आणल्याचं तपासामध्ये स्पष्ट झालं होतं. याच बॉम्बस्फोटातला एक आरोपी बंटी जहागिरदार याच्यावर गोळीबार झाल्याची घटना बुधवारी घडली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथे दुचाकीवरून आलेल्या दोघांनी जहागिरदार याच्यावर गोळ्या झाडल्या.

# कारमधून १५० किलो अमोनियम नायट्रेट जप्त

। राजस्थान । प्रतिनिधी ।

नव्या वर्षाच्या स्वागताची तयारी केली जात असतानाच राजस्थानमध्ये टोंक जिल्हा विशेष पथकाने बुधवारी एका वाहनातून १५० किलो अमोनियम नायट्रेट जप्त केल्याची माहिती दिली आहे. हे स्फोटक नक्की कोठे नेली जात होती, यामागच्या सर्व अंगाचा पोलीस तपास करत आहेत.

टोंकचे डेप्युटी एसपी मृत्युंजय मिश्रा म्हणाले की, डीएसटी प्रभारी ओम प्रकाश यांच्या नेतृत्वाखाली आज डीएसटी पथकाने मोठी करावाई केली आहे. बूंदी येथून टोंककडे एक मारूती सियाझ या कार येत होती. डीएसटीला एका वाहनाबद्दल गुप्त माहिती मिळाली आणि या कारला बारूनी पोलिस ठाण्याच्या हद्दीत रोखण्यात आले आणि त्यामधून स्फोटके जप्त करण्यात आली.

डेप्युटी एसपींनी पुढे बोलताना सांगितले की, स्फोटक १५० किलोग्राम अमोनियम नायट्रेट होते जे युरियाच्या पोत्यांमध्ये लपवण्यात आले होते. याव्यतिरिक्त, २०० किलो स्फोटक कार्ट्रिजेस आणि ११०० मीटर वायर देखील पोलिसांनी जप्त केले आहे. पोलिसांनी बुंदी येथील रहिवासी भंवरलाल याचा मुलगा सुरेंद्र, आणि धुली लाल यांचा मुलगा सुरेंद्र मोची यांना अटक केली आहे.

मिश्रा यांनी सांगितले की, अमोनियम नायट्रेट हे स्फोटांसाठी वापरले जाते. तसेच हे दोघे स्फोटके कशासाठी आणि कोठून आणले होते, तसेच हे कुठे नेले जात होते याचा शोध घेतला जात आहे. या दोघांबरोबर आणखी कोणी सहभागी होते का याचा देखील पोलिसांकडून तपास केला जात आहे.

ही स्फोटके खाणकामासाठी नेली जात होती की नवीन वर्षाच्या स्वागताच्या पार्श्वभूमीवर काही मोठा घातपात घडवण्याचा कट होता? या प्रश्नावर उत्तर देताना डेप्युटी एसपींनी, या प्रकरणाचा तपास सुरू असल्याचे सांगितले.

काही दिवसांपूर्वी दिल्लीत लाल किल्ल्याच्या परिसरात झालेल्या स्फोटाच्या पार्श्वभूमीवर देखील पोलिसांनी एका आरोपीच्या घरातून मोठ्या प्रमाणात अमोनियम नायट्रेट जप्त केले होते.



अलिबाग : रायगड जिल्ह्याचे सन २०२५ चे जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन'' या पुस्तिकेचे प्रकाशन जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपन्न झाले. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी उमेश सूर्यवंशी, दिप्ती पांडे, सांख्यिकी कार्यालयाचे कर्मचारी उपस्थित होते.

# मुरूड बाजारपेठेत श्रीरामाचा जयघोष

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

अयोध्यात श्रीराम मंदिरात दुसरा वार्षिकोत्सव साजरा होणार असुन त्याच अनुषंगाने आज मुरूड बाजारपेठ मित्र मंडळाच्या वतीने दुसरा वार्षिकोत्सव मोठ्या श्रीरामाच्या जयघोषात साजरा करण्यात आला.



बाजारपेठ मित्र मंडळाच्या वतीने मुख्य बाजारपेठेतील नाक्यावर भव्य मंडप टाकून दुसरा वार्षिकोत्सव श्रीरामा मूर्तीची पूजेचे मान शहरातील निरंजन यादव व त्यांच्या पत्नी सुधा यादव यांना मिळाला यावेळी पुरोहित समिर उपाध्येकडुन रामरक्षा पठण व अधिष्ठान पूजा करण्यात आली. तद्नंतर महाआरती करण्यात आली. श्रीराम दर्शन करिता असंख्य शहरातील व पंचक्रोशीतील भागातील श्रीराम भक्त उपस्थित होते. येणाऱ्या भक्तांना मुरूड बाजारपेठ मित्र मंडळाच्या वतीने तिर्थप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. मुरूड बाजारपेठ मित्र मंडळाचे सर्व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.


**PUBLIC NOTICE**

Take note that my client Umesh Jagannath Londhe, Senior Citizen and resident of Suncrest Accolade Society Pvt. Ltd. and Usha Gorakhnath Chindhe are title holders of land and property being plot bearing Survey No. 1176/2 Part, 1176/2 Peki of Village Alibaugh.
My client Usha Chindhe and Umesh J. Londhe Son of Kusum Londhe has entered into Agreement of Sale of all their rights in the above said land with Antonio George Ferrao @ Bandukwalla of Tuling, Goa. With complete understanding that the above said property is yet to be partitioned in compliance of the decree filed and pending before the Collector, Alibaugh. The same shall be delat with Antonio @ Bandukwalla.
All the rights arising out of the said decree being the legal heir of deceased Kusum Jagannath Londhe shall stand transfer vide Transfer Deed to be registered by and between the parties above name in respect of the property which is subject matter of execution before Collector, Alibaugh. Hereafter Antonio George Ferrao @ Bandukwalla.
Any person having any right or objection to the said transaction may file his objection in writing along with necessary documents within 15 days from the date of publication of this notice.
Date : 01.01.2026 **Sd/-**
**Adv. Anupama A. Sharma**
**204, Bhiwandiwalla Terrace,**
**Nr. Thane Dist. Court, Thane.**

# सदानंद दाते आता महाराष्ट्राचे नवे पोलीस महासंचालक

## ● ३ जानेवारीला स्वीकारणार पदभार

। मुंबई । प्रतिनिधी।



भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी सदानंद दाते यांची म हाराष्ट्र पोलीस महासंचालक म्हणून नियुक्ती निश्चित झाली आहे. राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांच्या जागी नवीन पोलीस महासंचालक कोण असेल याची चर्चा गेल्या महिन्यापासून सुरू होती. राज्याच्या गृह विभागाने त्यासाठी सात ज्येष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांची नावे केंद्रीय लोकसेवा आयोगाकडे पाठवली होती. राष्ट्रीय तपास संस्थेचे प्रमुख सदानंद दाते यांचे नाव यात प्रामुख्याने चर्चेत होते.

केंद्रीय लोकसेवा आयोगाने सातपैकी तीन नावांची निवड करून ती राज्य सरकारकडे पाठवली होती. त्यातून सदानंत दाते यांच्या नियुक्तीवर आज शिक्कामोर्तब करण्यात आले. एका अधिकृत निवेदनात महाराष्ट्र सरकारने म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्याच्या पोलीस महासंचालक भारतीय पोलीस सेवा रश्मी शुक्ला यांचा ममहाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालकफ म्हणून कार्यकाळ ३ जानेवारीला २०२६ रोजी संपत आहे. त्यानंतर सदानंद दाते पदभार स्वीकारतील.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या पॅनेलमेंट समितीने शिफारस केलेल्या पॅनेलमध्ये समाविष्ट असलेले सदानंद वसंत दाते, भारतीय पोलीस सेवा यांची महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाच्या संबंधित निकाल आणि आदेशानुसार, पोलीस महासंचालक या पदावर नियुक्त झालेल्या भारतीय पोलीस सेवेच्या अधिकाऱ्याचा कार्यकाळ दोन वर्षांचा असेल. त्यानुसार, भारतीय पोलीस सेवेचे सदानंद वसंत दाते हे नियुक्तीच्या तारखेपासून दोन वर्षांच्या कालावधीसाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य या पदावर राहतील.

सदानंद दाते १ एप्रिल २०२४ पासून राष्ट्रीय तपास संस्थेचे म हासंचालक होते. यापूर्वी त्यांनी सीबीआयमध्ये उपमहानिरीक्षक, महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख, मुंबईतील सह पोलीस आयुक्त आणि मीरा-भाईंदर आणि वसई-विरार प्रदेशांचे पोलीस आयुक्त म्हणून काम पाहिले आहे. दाते यांनी वाणिज्य विषयात पदव्युत्तर पदवी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून डॉक्टरेट, इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडियामधून पात्र कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट आणि हम्फ्रे फेलोशिप अंतर्गत मिनेसोटा विद्यापीठात व्हाईट-कॉलर आणि संघटित गुन्हेगारी नियंत्रणाचा अभ्यास केला आहे.

# मोर्बा युनायटेड इंग्लिश स्कुलमध्ये कृषी महोत्सव

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या युनायटेड एज्युकेशन अँड ट्रस्ट संचालित युनायटेड इंग्लिश स्कुल मोर्बा शाळेने प्रथमच शाळेच्या मैदानावर कृषी महोत्सव व कृषी प्रदर्शन म्हणजेच फार्मर फेस्टा कार्यक्रम आयोजित केला होता. या महोत्सवाला उत्स्फुर्त असा प्रतिसाद लाभला. प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी साकारलेल्या आकर्षक प्रतिकृतींचे उपस्थित मान्यवरांनी भरभरून कौतुक केले.

मोर्बा युनायटेड इंग्लिश स्कुलने शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील विकासाबरोबरच विद्यार्थी व पालकांना वेगवेगळ्या गोष्टींची माहिती व्हावी यासाठी हि शाळा वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवित असते. या शाळेने शेतीकडे लक्ष देऊन प्रथमच कृषी महोत्सव व कृषी प्रदर्शनाचे तसेच कृषी दिनाचे शानदार आयोजन शाळेत केले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन माणगाव तालुका कृषी अधिकारी रवी शंकर कावळे व पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या हस्ते करण्यात आले.



या कार्यक्रमास कृषी अधिकारी मधुकर शेंडे, कृषी अधिकारी प्रतीक बांगर, शाळेचे विश्वस्त आसफ पल्लवकर, आयडियल इंग्लिश स्कुल महाडचे मुख्याध्यापक संभाजीराव सूर्यवंशी, याकूब मुकादम, फैझ सरखोत, शाळेच्या मुख्याध्यापिका रुबिना बडे, शेतकरी विठोबा पालकर, राकेश पोवार, गजानन पोवार, महेश पोवार, दिपक पोवार आदींसह शाळेचे सर्व शिक्षकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोर्बा युनायटेड इंग्लिश स्कुलने साकारलेल्या या कृषी प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे हुबेहूब असे जीवनमान तसेच जुन्या काळातील शेती व आहार पद्धती, जुने खेळ, परंपरा यांचे उत्कृष्टपणे प्रदर्शन मांडले होते. हे प्रदर्शन पाहून उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या मुख्याध्यापिका रुबिना बडे, शाळेचे सर्व शिक्षकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद व विद्यार्थी यांचे विशेष कौतुक केले.

यावेळी मार्गदर्शन करताना तालुका कृषी अधिकारी रवी शंकर कावळे यांनी सुरवातीलाच युनायटेड स्कुलचे हा स्तुत्य उपक्रम साकारल्याने कौतुक केले. ते म्हणाले भारत हा कृषी प्रदान देश आहे. कोरोना काळात भारतीय अर्थव्यवस्था तारण्याचे काम कृषी विभागाने केले. कृषी विभागाच्या भरपूर योजना आहेत. कृषी विभाग आता नैसिर्गिक व गट शेती योजना राबवित आहेत. शेतकऱ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा त्यांना लागणारे मार्गदर्शन आम्ही करू असे सांगून शाळेने दरवर्षी हा उपक्रम राबवावा अशा शुभेच्छा शाळेला दिल्या. पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांनी आपल्या मार्गदर्शनात शेतकऱ्यांनी शेती ठेवा, शेती विकू नका असे सांगत शेतीतून आपले जीवनमान उंचवावे असे आवाहन केले.

**उपविभागीय अधिकारी, माणगाव उपविभाग, माणगाव, जि. रायगड**
**यांच्या न्यायालयातील कामकाज**
**कचेरी रोड, माणगाव, ता. माणगाव, जि. रायगड**
दूरध्वनी क्र. ०२१४०-२६३१४१ Email - sdomangaon@gmail.com

**सुनावणीची जाहीर नोटीस** आरटीएस अपील-९०/२०२५

श्री. नारायण पांडूरंग पिरदनकर उर्फ चांभार अपिलार्थी
रा. भादाव, ता. माणगांव, जि. रायगड
विरुद्ध
१) श्री. बाळाराम गणपत तेटगुरे
२) श्रीमती विठाबाई काशिराम धसाडे
३) श्रीमती जयवंती सिताराम पालकर
४) श्रीमती पार्वती पांडूरंग पालकर
५) श्रीमती विठाबाई दत्ताराम पालकर
६) श्रीमती लक्ष्मी तुकाराम केकाणे
७) श्रीमती नर्मदा सखाराम शिंदे
८) श्रीमती इंदु महादेव डवले
९) श्रीमती सरीता साधु भोनकर
१०) श्री.धोंडू भिकू तेटगुरे उत्तरार्थी
११) श्री.बळीराम बाबु तेटगुरे
१२) श्री. नारायण बाबु तेटगुरे
१३) श्रीमती विठाबाई बाबु तेटगुरे
१४) श्री.बाळाराम गोविंद तळकर
१५) श्रीमती रजनी शांताराम उभारे
१६) श्री. प्रसाद शांताराम उभारे
१७) श्रीमती राखी शांताराम उभारे
क्र. १ ते १७ सर्व रा. भादाव, ता. माणगांव, जि. रायगड
१८) श्रीमती जबीन महम्मद अस्लम मुंशी
रा. फ्लॅट नं. सी ३०१, निक्की टॉवर प्लॉट नं. २०१०,
विश्रली तलावा जवळ, नवी मुंबई ४१०२०६

अपिलार्थी, श्री. नारायण पांडूरंग पिरदनकर उर्फ चांभार रा. भादाव, ता. माणगांव, जि. रायगड यांनी मौजे भादाव, ता. माणगांव, जि. रायगड येथील शेतजमीन स.नं./गट नं. ७६/१ क्षेत्र ४.६६.५० हे. आर. या जमिनीच्या संदर्भात घेण्यांत आलेली फेरफार नोंद क्र. ४६३, १०५४, २०५६, २०६४ व २०९१ आव्हानित करण्यासाठी या न्यायालयात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील सादर केले आहे. उत्तरार्थी यांनी नोटीसची बजावणी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे करण्याचा प्रयत्न केला असता, बजावणी होऊ शकलेली नाही. यास्तव सदर जाहीर नोटीसीद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, उक्त अपील प्रकरणाची सुनावणी या कार्यालयात दिनांक १५/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे. त्यावेळी आपण स्वतः किंवा योग्यरीत्या प्राधिकृत व्यक्ती किंवा विधीज्ञ यांचे माध्यमातुन आवश्यक कागदपत्रांसह हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. वरीलप्रमाणे आपण हजर राहुन बाजू मांडण्यात कसूर केल्यास प्रस्तुत अपिलाची सुनावणी एकतर्फी पुर्ण करुन कागदपत्रांच्या गुणवत्तेवर आधारीत न्यायनिर्णय पारित करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- माणगांव सही/-
दिनांक :- १२/१२/२०२५ **(डॉ. संदीपान सानप)**
**उपविभागीय अधिकारी**
**माणगांव उपविभाग माणगांव**

## पर्यटकांची रेलचेल; सागरी मासळीला मोठी मागणी, दरातही वाढ

# थर्टी फर्स्टला खवय्यांचा मासळीवर ताव

। पाली । प्रतिनिधी ।

थर्टी फर्स्ट आणि नववर्षाच्या स्वागताच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यात पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असून खवय्यांनी यंदा मासळीवर विशेष ताव मारल्याचे चित्र पाहायला मिळाले. सध्या समुद्रातील मासेमारी जोरात सुरू असल्याने मोठ्या प्रमाणात ताजी मासळी उपलब्ध होत आहे. याचा थेट फायदा मासळी व्यवसायाला झाला असून विक्रीत वाढ झाली आहे.

रायगडला तब्बल २४० किलामीटर लांबीचा विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला आहे. त्यामुळे येथे खाऱ्या पाण्यातील विविध प्रकारची ताजी मासळी सहज उपलब्ध होते. नाताळच्या सुट्ट्यांमुळे जिल्ह्यातील



समुद्रकिनारे, पर्यटनस्थळे, फार्महाउस आणि कॉटेजेस पर्यटकांनी गजबजून गेली आहेत. अनेक पर्यटक खास ताजी आणि चवदार मासळीचा आस्वाद घेण्यासाठी दाखल होत असल्याचे दिसून आले. येथील मासळी मोठ्या प्रमाणावर मुंबई तसेच इतर शहरांमध्येही पाठवली जात आहे. कोळंबी, सुरमई, रावस, घोळ, टोळ, कर्ली, पापलेट यांसारख्या माशांना विशेष मागणी असून बागडा, बोंबील, मांदेली आणि बांगडा यांचीही लॉटरी लागत असल्याचे मासळी विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे. वाढलेल्या मागणीमुळे मासळीच्या दरातही चढ-उतार पाहायला मिळत आहे.

### आगाऊ बुकिंगमुळे व्यवसाय तेजीत

नाताळच्या सुट्ट्या आणि वर्षअखेरच्या सेलिब्रेशनमुळे मासळीला मोठी मागणी असून विक्री चांगली होत आहे. मासळी मुबलक आणि ताजी मिळत असल्याने खवय्ये खुश आहेत. थर्टी फर्स्टसाठी अनेकांनी आधीच आगाऊ बुकिंग केली आहे, अशी माहिती येथील मासळी विक्रेत्यांनी दिली.

### मासळीचे अंदाजे दर (प्रति किलो)

**बोंबील :** ४०० ते ६०० रुपये.
**पापलेट (मध्यम) :** १,००० ते १,२०० रुपये.
**पापलेट (मोठे) :** १,२०० ते १,६०० रुपये.
**सुरमई, घोळ, रावस :** १,००० ते १,२०० रुपये.
**मांदेली :** २०० ते ३०० रुपये.
**मध्यम कोळंबी :** ४०० ते ६०० रुपये.
**बांगडा (मालवणी) :** ४०० ते ५०० रुपये.
**हलवा :** ७०० ते ८०० रुपये.
**टोळ :** ५०० ते ६०० रुपये.

## संजय राऊत यांना मारण्याची धमकी

**मुंबई :** शिवसेनेचे (ठाकरे) खासदार संजय राऊत यांना बुधवारी अज्ञात व्यक्तीने बॉम्बने उडवून देण्याची धमकी दिली. या प्रकरणी कांजूरमार्ग पोलिसांनी आज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला असून पोलीस धमकी देणाऱ्या व्यक्तीचा शोध घेत आहेत. खासदार संजय राऊत कुटुंबियांसह भांडुप परिसरात वास्तवास आहेत. संजय राऊत घराबाहेर उभ्या असलेल्या एका मोटारगाडीवर अज्ञात व्यक्तीने बुधवारी त्यांना ठार मारण्याचा संदेश लिहिला होता. गेल्या अनेक दिवसांपासून त्यांच्या घराबाहेर एक मोटारगाडी उभी असून त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ साचली आहे. या धुळीवरच संजय राऊत यांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी लिहिण्यात आली होती.

# रस्ता खड्ड्यात, पैसा धारपांच्या खात्यात?

| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

**२०१९ पासून सुरु झालेला १७७.७९ कोटी रुपयांचा अलिबाग–रोहा हा मेगा रोड प्रकल्प आजही अपूर्ण अवस्थेत पडला आहे. या रस्त्याच्या रखडपट्टीबाबत धक्कादायक खुलासे समोर आले आहेत. अलिबाग ते रोहा–कणघर–वावे (एसएच–९१) हा ८५.६३ किमी लांबीचा दुपदरी रस्ता बनवण्यासाठी हॅम मॉडेल अंतर्गत गुजरातच्या कंपनीला कंत्राट दिले होते. पण ६ वर्ष उलटूनही हा रस्ता केवळ ६० टक्के पूर्ण झाला आहे. यामागचे नेमके कारण आता माहितीच्या अधिकारातून समोर आले असून या दस्तऐवजांमुळे खळबळ उडाली आहे.**

अलिबागचे सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम विभागाने ११ पानांचे गोपनीय दस्तऐवज उपलब्ध करून दिले आहेत. यामध्ये महाराष्ट्र रोड इम्प्रूव्हमेंट प्रोजेक्ट (एमआरआयपी) पॅकेज अंतर्गत हा प्रकल्प असल्याचे सांगण्यात आले. निविदा क्रमांक २०१९ पीडब्ल्यूआर ४४३१२०१ अंतर्गत, रायगड सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांनी १६ डिसेंबर २०१९ रोजी एमएस जेआरएआयपीएल–एम आयसीपीएल कन्सोर्टियम (जे.व्ही.) ला लेटर ऑफ अवॉर्ड (एलओए) जारी केले होते. या कन्सोर्टियमने २२ फेब्रुवारी २०२० रोजी एसपीव्ही प्रस्ताव सादर केला, ज्याच्या आधारे एम/एस. जेआरए अलिबाग रोड प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी तयार करण्यात आली. या कंपनीमध्ये जुगलकिशोर अग्रवाल व सतीश वासुदेव धारप हे दोन डायरेक्टर आहेत. या कंपनीला २०१९ चा लेटर ऑफ अवॉर्ड, कन्सेशन ॲग्रीमेंट आणि थर्ड माइलस्टोनचे १०६ कोटींचे बिल दिल्याचे समाविष्ट आहे.

## नागरिकांचा संताप, जीव धोक्यात!

६ वर्ष झाली, रस्त्याची चाळण झाली. खड्डे, धूळ, अपघात हा रोजचाच त्रास झाला आहे. सरकार मॉडेलचा नाद सोडून काम पूर्ण करा, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिकांनी दिली. विरोधकांनी थेट सरकारवर आरोप केले तर खासगी कंपन्यांना कोट्यवधी रुपये लाटले असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी अडचणींमुळे रस्त्याला विलंब झाला असून लवकरच पूर्ण होईल, असे आश्वासन देत आहेत. मात्र, दस्तऐवज वेगळीच कहाणी सांगत असल्याचे सावंत यांनी स्पष्ट केले आहे.




## आता काय होणार? चौकशीची मागणी जोरात

दस्तऐवजातील बिल (४७) नुसार, प्रकल्पाची प्रगती ६० टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. यात खालील तपशील आहेत: अर्थवर्क (सब–ग्रेड पर्यंत): ३.४४०% पूर्ण, ६,११,५९,७६० रुपये. ग्रॅन्युलर वर्क : ९.३२०% पूर्ण, १५,५७,००,२६० रुपये. ग्रॅन्युलर वर्क : ४.७५०% पूर्ण, ८,४४,५०,२५० रुपये. शोल्डर्स: १.०८०% पूर्ण, १,९२,०१,३२० रुपये. बिटुमिनस वर्क (टॅक कोट आणि प्राइम कोट): ०.७३०% पूर्ण, १,२९,७८,६७० रुपये. बिटुमिनस वर्क : ०.४४०% पूर्ण, ७८,२२,७६० रुपये.

एकूण बिल १,०५,६७,४०,००० रुपये असून, १८% सह १९,२०,१३,२०० रुपये जोडले गेले आहेत. यात मोबिलायझेशन ॲडव्हान्स म्हणून १७,७७,९०,००० रुपये दिले गेले असून, त्यातील रिकव्हरी सुरू आहे. थर्ड माइलस्टोननुसार ही बिले प्रस्तावित आहेत. मात्र प्रकल्प २०२३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असताना २०२५ मध्येही काम प्रगतीपथावर आहे.

या मार्गावरील रामराज ते सुडकोली दरम्यानचे ५ पूल धोकादायक असल्याचे यापुर्वीच बांधकाम विभागाने स्पष्ट केले आहे. या मार्गावरुन अवजड वाहनांना बंदी करण्यात आली असून प्रवासी जीव मुठीत घेऊन प्रवास करत आहेत. २०२३ पर्यंत पूर्ण होणारा प्रकल्प २०२५ मध्येही अपूर्णच आहे. या मार्गाचे अर्थवर्क ३.४४ टक्के, ग्रॅन्युलर वर्क (खडीकाम) १४ टक्के तर बिटुमेन वर्क (डांबरीकरण) अवघे १ टक्के झाले असून हे आकडे पाहून नागरिकांनाही धक्का बसला आहे. समोर आलेल्या माहितीनूसार, राज्य सरकारच्या तिजोरीत खडखडाट असल्यामुळे हा प्रकल्प रखडला आहे. गुजरातची जेआरए अलिबाग रोड प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला १७७ कोटींचे कंत्राट मिळाले. मोबिलायझेशन ॲडव्हान्स म्हणून १७.७७ कोटी दिले, पण काम रखडले. इतकेच नाही तर नोव्हेंबरमध्ये रोहा–रामराज मार्गावरील पूल कोसळला, सर्व वाहतूक बंद झाली होती. पर्यटकांचे अलिबागचे स्वप्न धुळीस मिळाले. तरीही ठेकेदारावर कोणताही दबाव बांधकाम विभागाकडून टाकण्यात आलेला दिसत नाही.

## ठेकेदार बदलता येतो का?

सामान्यतः ठेकेदार बदलता येत नाही. एनएचएआयच्या धोरणानुसार (ऑगस्ट २०२५ च्या पॉलिसी सर्क्युलरनुसार), ठेकेदार बदलणे हे अनइंडिझायरेबल प्रॅक्टिस मानले जाते आणि ते प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीशिवाय करता येत नाही. अशी परवानगी न घेता बदल केल्यास ठेकेदाराला काळ्या यादीत टाकता येते किंवा इतर दंड लागू होऊ शकतात. हे नियम मॉडेल कन्सेशन अग्रीमेंट (एमसीए) आणि आरएफपी (Request for Proposal) मध्ये नमूद आहेत. ज्यामुळे प्रोजेक्टची गुणवत्ता, जबाबदारी आणि पारदर्शकता सुनिश्चित होते. ठेकेदाराची निवड बिडिंग प्रक्रियेतच होते. आणि नंतर बदलण्यासाठी विशेष कारणे व पूर्वमंजुरी आवश्यक असते.

## अनियमिततेचे आरोप आणि प्रतिक्रिया

या मधून प्रकल्पातील विलंब स्पष्ट होत असल्याने स्थानिक नागरिकांनी असंतोष व्यक्त केला आहे. २०१९ पासून सुरू असलेला प्रकल्प २०२५ मध्येही अपूर्ण आहे. यामुळे प्रवासात अडथळे येत आहेत आणि खर्च वाढत आहे, असे संजय सावंत यांनी सांगितले. विरोधी पक्षांनी यावरून सरकारला घेरले असून, मॉडेल अंतर्गत खासगी कंपन्यांना फायदा होत असल्याचे दिसते, मात्र जनतेचे नुकसान होत आहे, अशी टीका केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी मात्र यावर प्रतिक्रिया देताना सांगितले की, प्रकल्पातील अडचणींमुळे विलंब झाला आहे. लवकरच रस्ता पूर्णत्वाकडे जाईल. तथापि, माहितीच्या अधिकारात कोणत्याही अनियमिततेचा उल्लेख नसला तरी दस्तऐवजातील तपशीलांमुळे चौकशीची मागणी होत आहे.

# भावना घाणेकर यांच्या कामांचा धडाका


| उरण | प्रतिनिधी |

महाविकास आघाडीच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी पदभार स्वीकारताच उरण नगरपालिकेतील प्रलंबित प्रश्नांवर थेट कारवाईचा पवित्रा घेतला आहे. कार्यालयीन कागदपत्रांपुरते मर्यादित न राहता त्यांनी स्वतः घटनास्थळी जाऊन पाहणी करत संबंधित अधिकारी वर्गाला जबाबदार धरत कामाच्या मार्गावर लावण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत.



नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी बुधवारी (दि.३१) श्रीमान बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुलाला अचानक भेट दिली. या क्रीडा संकुलाची अवस्था अत्यंत धोकादायक व जीर्ण असल्याचे दिसून आले. याबाबत अधिकारी वर्गाकडे विचारणा करताच समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. एखादी दुर्घटना घडल्यावरच प्रशासन जागे होणार का? असा सवाल करत त्यांनी प्रशासनाची जबाबदारी निश्चित केली. या क्रीडा संकुलाचा ठेका कधी, कोणाला व कोणत्या कायदेशीर प्रक्रियेतून देण्यात आला, याची सविस्तर माहिती तात्काळ सादर करण्याचे आदेश नगराध्यक्षा घाणेकर यांनी दिले आहेत. ठेका कायदेशीर नसेल तर त्याबाबत कठोर निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, पदभार स्वीकारताच नगराध्यक्षा घाणेकर यांनी मोरा प्रभागात साचलेल्या कचऱ्याच्या समस्येवर तातडीची कारवाई केली. नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत त्यांनी आरोग्य विभागाची बैठक घेतली व त्यानंतर प्रत्यक्ष मोरा येथे जाऊन परिस्थितीची पाहणी केली. साचलेला कचरा, पसरलेली दुर्गंधी व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले पाहून त्यांनी आरोग्य निरीक्षक हरेश तेजी यांना तात्काळ कचरा उचलण्याचे आदेश दिले. या बैठकीनस माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे, नगरसेवक अतुल ठाकूर, विक्रांत म्हात्रे, नगरसेविका नाहिदा ठाकूर, प्रार्थना म्हात्रे, प्रमिला पवार, वंदना पवार तसेच माजी नगरसेवक उपस्थित होते.



● बडोदाचे महाराज सयाजीराव गायकवाड यांचे वारस समरजित महाराज गायकवाड यांची बडोदा येथील लक्ष्मी पॅलेस येथे शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, सतीश टकले व संतोष जंगम यांनी सदिच्छा भेट घेतली.

# उरणमध्ये शिंदे सेनेचा फुसका बार

- **खा. बारणेंचा मतदारसंघातच दारूण पराभव**
- **तब्बल सहा उमेदवारांचे डिपॉझिट जप्त**

| उरण | प्रतिनिधी |

उरण नगरपरिषद निवडणुकीत सत्ताधारी महायुतीतील शिवसेना (शिंदे गट) पक्षाला जोरदार झटका बसला असून तब्बल ६ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहेत. विशेष म्हणजे यामध्ये शिंदेसेनेच्या उमेदवारांची संख्या अधिक असल्याने उरणमध्ये या गटाची राजकीय ताकद किती पोकळ आहे, हे जनतेने ठणकावून सांगितले आहे. उरण हा मावळ लोकसभा मतदारसंघात येतो आणि या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे खासदार म्हणजे अनेकवेळा 'संसद रत्न' पुरस्काराने सन्मानित खासदार श्रीरंग बारणे हे आहेत. मात्र, त्यांच्या मतदारसंघातच पक्षाच्या उमेदवारांना दारुण पराभव स्वीकारावा लागला, ही बाब उरणच्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे.

उरण नगरपालिका निवडणुकीसाठी एकूण ५३ उमेदवार रिंगणात होते. त्यापैकी नगराध्यक्ष व २१ नगरसेवक असे २२ उमेदवार निवडून आले, तर ३२ उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला. यामधील ६ उमेदवारांना किमान मतेही मिळू न शकल्याने त्यांचे डिपॉझिट जप्त झाले आहे. त्यात डिपॉझिट जप्त झालेल्यांमध्ये शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे उमेदवार अधिक असल्याने उरणमध्ये या पक्षाची संघटनात्मक ताकद शून्याच्या घरात असल्याचे स्पष्ट झाले आहे. शिवसेना फुटीनंतर खा. बारणे यांनी शिंदे गटात प्रवेश केला होता. त्यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत उबाठा आणि शिंदे गटामध्ये थेट लढत होऊन बारणे विजयी झाले होते. मात्र, उरण पालिका निवडणुकीत तो 'विजयाचा करिष्मा' पूर्णपणे गायब झाल्याचे चित्र दिसले. खा. बारणे यांच्या नेतृत्वाखाली शिंदे गटाने ही निवडणूक लढवली होती. तुषार ठाकूर आणि रुपाली ठाकूर या पतिपत्नीला थेट पक्षप्रवेश देत रुपाली ठाकूर यांना नगराध्यक्षपदाची उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, निकाल जाहीर होताच नगराध्यक्षपदाच्या उमेदवार रुपाली ठाकूर यांचेही डिपॉझिट जप्त झाले. त्यांच्यासोबत अपक्ष नगराध्यक्ष उमेदवार नसरीन इसरार शेख यांचेही डिपॉझिट जप्त झाला आहे. नगरसेवकांमध्ये अनंत कोळी, हंसराज चव्हाण, मुकरी अश्मील मोहम्मद अली (सर्व शिवसेना शिंदे) व अंजली खंडागळे (वंचित बहुजन आघाडी) यांचा समावेश आहे. मातब्बर खासदारांचे नेतृत्व, थेट पक्षप्रवेश, सत्तेचा माज तरीही उरणच्या जनतेने शिंदेसेनेला सपशेल नाकारले आहे.

# दुचाकी अपघातामध्ये तरुण ठार

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

हर्षित पालवणकर व शिवम गुप्ता हे दोन तरूण त्यांच्या दुचाकीवरून मांडवा ते अलिबाग असा प्रवास करीत होते. मंगळवारी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास चोंढी पुलाजवळ आल्यावर चालकाचा दुचाकीवरील ताबा सुटला. त्यामुळे रस्त्याच्या बाजूला असलेल्या फलकाच्या खांबाला दुचाकीची जोरदार धडक लागली. या धडकेत दोघांना गंभीर दुखापत झाली. या घटनेची माहिती मिळताच मांडवा पोलीस आणि स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तात्काळ उपचारासाठी अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. मात्र, शिवम गुप्ता याची प्रकृती अधिक बिघडल्याने त्याला अधिक उपचारासाठी नवी मुंबई येथील एमजीएम रुग्णालयात रवाना करण्यात आले. परंतु, हर्षित पालवणकरचा उपचारादम्यान मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# सागाव धरणामध्ये सापडला मृतदेह

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील सागाव परिसरातील धरणामध्ये बुधवारी (दि.३१) एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह. मात्र, या मृतदेहाची अद्याप ओळख पटली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, काही स्थानिक बुधवारी सकाळी सागाव येथील मारुतीच्या मंदिराच्या मागे असलेल्या धरणाजवळ गेले होते. त्यावेळी त्यांना एक व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत पाण्यामध्ये तरंगता दिसून आला. या घटनेची माहिती तात्काळ पोलीस पाटील आणि अलिबाग पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाण्यातील मृतदेह स्थानिकांच्या मदतीने बाहेर काढण्यात आला. त्यानंतर त्याची पाहणी करण्यात आली.

# प्रिआ स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन



| रसायनी | प्रतिनिधी |

विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता व नेतृत्व गुणांसह सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी या उद्देशाने मोहोपाडा प्रिआ स्कूलच्या भव्य प्रांगणामध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाचा दैदिप्यमान सोहळा उत्साहात पार पडला. यशाचा मंत्र या संकल्पनेवर आधारित असलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाविष्कारांनी उपस्थितांची मने जिंकली. यावेळी प्रमुख पाहूणे माजी विद्यार्थी तथा इंडियन नेव्हीचे कमांडर मुकेश शर्मा, प्रिआ ट्रस्टचे प्रेसिडेंट सुनील कदम, प्रिआ स्कूल कमिटीचे चेअरमन संदीप शिर्के, सदस्य कल्पेश पाटील, रोहिदास गायकवाड, डी.एस. गुरव, मीनल मोकल, पालक वर्ग व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲनी जॉन्सन यांनी केले. संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका पर्यवेक्षिका, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली.

**शाळा ताब्यात घेणाचा प्रयत्न | व्यवस्थापन समितीचा आरोप**

# शाळा वाचविण्यासाठी एकवटले

| रसायनी | प्रतिनिधी |

रसायनीतील महिला उद्योग मंडळाने मुलांच्या शिक्षणासाठी सुरू ठेवलेली शाळा कोणत्याही दबावाला बळी न पडता सुरू ठेऊ. तसेच, ही संस्था आणि शाळा ताब्यात घेण्याचा प्रयत्न हाणून पाडू, असे वक्तव्य शाळा व्यवस्थापनाच्या अध्यक्षा सरोजिनी साजविन यांनी केले.

परांडे–मोहपाडा येथील महिला उद्योग मंडळाची प्राथमिक शाळा असून ती बेकायदेशीर असल्याचा आरोप सोशल मीडियावरून व्हायरल झाली आहे. त्याबाबत बुधवारी (दि.३१) पालक, माजी विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते व संस्थेची बैठक आयोजित केली होती. त्यावेळी पत्रकार परिषद देखील पार पडली. त्यावेळी त्या बोलत होत्या.

रसायनी येथील महिला उद्योग मंडळ संचलित प्राथमिक शाळा विद्यार्थ्यांकडून बेकायदेशीर पद्धतीने



मासिक फी घेत असल्याचे आणि विनापरवानगी जिर्ण इमारतीत स्थलांतरीत करून पालक आणि शिक्षण विभागाची फसवणूक करत असल्याचे आरोप करण्यात आले होते. त्यासंदर्भात बुधवारी बैठक आयोजित केली होती.

यावेळी बोलताना सरोजिनी साजवान म्हणाल्या की, हिंदुस्थान ऑर्गॅनिक कंपनी व्यवस्थापनातील महिला व पुरुष अधिकाऱ्यांच्या पत्नी एकत्र येऊन त्यांनी महिला उद्योग मंडळ स्थापन केले. त्यानंतर कंपनीच्या एका निवासी इमारतीत शिशु वर्ग सुरू केला. त्यानंतर तत्कालीन कंपनी अधिकारी आणि मंडळाच्या अध्यक्षा रिना रामचंद्रांन यांनी या शाळेला मान्यता घेतली. सन २००० नंतर रामचंदन यांनी कंपनी सोडल्याने कंपनीकडून शाळेला देण्यात येणारी मदत बंद झाली. त्यामुळे फी देऊन शिक्षण घेणाऱ्या मुलांना शाळेत प्रवेश द्यायला सुरुवात झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांची संख्या वाढत गेल्यामुळे पराडे येथील दोन खोल्या कमी पडायला लागल्याने पुन्हा माणिक बिल्डिंगमध्ये शिशु वर्गासाठी ज्या खोल्या दिल्या होत्या तेथे शाळा सुरू केली. दरम्यान, एचओसी कंपनीने आपली कंपनी विकून बीपीसीएलला विकली. येथील पुढारी अरुण गायकवाड यांनी शाळेची प्रगती करू, असे महिला मंडळ व्यवस्थापनाला सांगून पद ग्रहण केले आणि हळूहळू छोट्या छोट्या चुका काढून संस्थेवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न सुरू केला. तसेच, शाळेची इमारत नादुरुस्त असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका आहे, अशा खोट्या अफवा पसरविण्यात येत आहेत. त्या दुसऱ्या कंपनीला विकायच्या असल्यामुळे हा डाव रचला जात आहे, असा आरोप साजवान यांनी केला आहे.

> **खालापूर तालुक्यात सर्वाधिक पटसंख्या असणारी शाळा म्हणून ओळख असून गरजू गोरगरीबांना परवडणारी शाळा आहे. घरच्याप्रमाणे विद्यार्थ्यांची शाळेत काळजी घेतली जाते. आमची फसवणूक करुन शाळा बंद करण्याचे षडयंत्र आहे. याच शाळेतून शिक्षण घेऊन विद्यार्थी घडले आहेत. या शाळेच्या इमारतीची दरवर्षी देखभाल दुरुस्तीचे कामे केली जातात. स्वतःच्या भल्यासाठी शाळा बंद करण्यासाठी काहींचे प्रयत्न सुरु आहेत.**
> **– सरोजिनी साजवान, अध्यक्ष, शालेय कमिटी**

# मतिमंद मुलांच्या चेहऱ्यावर 'स्नेह स्पंदन'

| चणेरा | प्रतिनिधी |

स्नेह स्पंदन ही शैक्षणिक व सामाजिक संस्था गेली तब्बल ११ वर्षे रोहा येथील मतिमंद मुलांच्या प्रेरणा विद्यालयात विद्यार्थ्यांचा सामुदायिक वाढदिवस सातत्याने साजरा करत आहे. यंदा संस्थेच्या अध्यक्षा स्वाती शेळके यांच्या संकल्पनेतून सोमवारी (दि.२९) या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी ३ वाजता केक कापून मुलांचा सामुदायिक वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि उत्साह सर्वांनाच भावून गेला. त्यानंतर क्रीडा स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान करून त्यांचे कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून रोहा नगरपरिषदेच्या नगरसेविका स्नेहा आंब्रे, केंद्र प्रमुख ईश्वर



लाडे, त्वष्टा कासार समाज अष्टमीचे अध्यक्ष हेमंत साळवी व सभासद, त्वष्टा कासार महिला अध्यक्षा रूपाली वडके, शिव आधार फाऊंडेशनचे अध्यक्ष नारायण खुळे, निसर्ग वन्यजीव संवर्धन संस्था रायगडचे प्रथमेश कोळी, ब्रह्मकुमारी पूनम, जयश्री भांड आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आशीर्वाद दिले.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# आज काय बदलेल?

आजच्या दिवसापासून काय बदलेल? बाकी काही नाही तरी भिंतीवरची दिनदर्शिका नक्की बदलेल. तारीख आणि महिना एरवी बारा महिने बदलत असतातच. पण आजपासून वर्षाचा आकडाही बदलेल. हा आकडा आहे इंग्रजी परंपरेतला. ग्रेगरियन असे त्याचे नाव आहे. पण आता आपल्या सर्वांच्याच जीवनाला त्याने व्यापले आहे. म्हणूनच ३१ डिसेंबरला निरोप देण्याचा आणि १ जानेवारीचे स्वागत करण्याचा उत्साह फार मोठा असतो. एरवी आपल्याकडे एकाच वर्षात अनेकदा नवीन वर्षे साजरी करण्याचा प्रसंग येतो. एक एप्रिलला आर्थिक नवीन वर्ष सुरू होते. नवीन कर लागू होतात. गुढीपाडव्याला मराठी नववर्ष येते. मृग नक्षत्राला पाऊस लागला की बहुसंख्य शेतकऱ्यांचे नवीन वर्ष नव्हे तर नवीन आयुष्यच सुरू होते. दिवाळीच्या पाडव्याला व्यापाऱ्यांचे नवीन वर्ष सुरू होते. आता त्यांचे महत्व केवळ धार्मिक परंपरेपुरतेच उरले असले तरी नव्या चोपड्यांची पूजा केली जाते. शुभ लाभ काढला जातो. याखेरीज पारशी, मुस्लिम यांचे आपापले नवीन वर्ष असतेच. आपण तेही साजरे करतो. बहुतांश शाळा, बँका आणि सरकारी कार्यालयांना तेव्हा सुट्टी असल्याने आपोआप आपल्याला त्याविषयी कळत राहते. याखेरीज हरेक प्रांतात एका विशिष्ट सणाला नवीन वर्षाचाच उत्साह असतो. केरळात ओणम किंवा आसामात बिहू आणि तमिळनाडूत पोंगल किंवा सक्रांत. सक्रांतींला सूर्य पुन्हा दक्षिण गोलार्धातून आपल्याकडे म्हणजे उत्तरेला येऊ लागतो. त्यामुळे तेही एक मन्वंतरच असते. पण हे सगळे खरे असले तरी नवीन वर्ष म्हटले म्हणजे २०२५ जाऊन २०२६ लागते तेच. म्हणजे आजचा दिवस. एकदा ही वर्षाची तारीख बदलली की बऱ्याच गोष्टी बदलतात. तुमचा वाढदिवस भले ऑगस्टमध्ये असो की नोव्हेंबरात. २०२६ सुरु झाले की तुमच्यासाठी तुमचे वयही बदलते. वर्ष बदलले की वीसवाला एकविशीत किंवा ३९वाला चाळिशीत मनानेच प्रवेश करतो. भले त्याचा वाढदिवस कधीही असो. आणखी एक वर्ष सरले असे वाटण्याचा प्रसंग गुढीपाडव्याला किंवा दिवाळी पाडव्याला येत नाही. पण ३१ डिसेंबरला मात्र हमखास येतो.

## पाव शतक सरले

२०२५ संपले म्हणजे या शतकातली पंचवीस वर्षे किंवा पाव शतक संपले. इसवी सन दोन हजार लागले तेव्हा अनेकांना आपण शतक बदलाचे साक्षीदार असणार याचे अप्रूप वाटले होते. आता त्या पिढीनेही २५ वर्षे पार केली. दोन हजारच्या सुरुवातीला वायटूके प्रॉब्लेम येईल आणि सगळे संगणक बंद पडतील असे वाटत होते. तसे झाले नाही. २००० आले तेव्हा व्हॉटसॅप किंवा यूट्यूब यांचा उदय झालेला नव्हता. आता त्यांच्याविना जगाची कल्पनाही करणे अशक्य वाटते. २५ वर्षांपूर्वी मोबाईल ही नवलाई होती. आता मोबाईलशिवाय भारतात जगताच येणार नाही अशी अवस्था आहे. तुमचा गॅस सिलेंडर नोंदवायचा असेल तरीही किंवा बँकेच्या खात्याचे साधे व्यवहार करायचे असतील तरीही मोबाईल असणे अनिवार्य झाले आहे. ओटीपी हा सध्याचा कळीचा शब्द आहे व तो अगदी खेड्यापाड्यात पोचला आहे. २०२६ येता येता आता एआय किंवा आर्टिफिशियल इंटेलिजन्सची चर्चा जोरात आहे. चॅट जीपीटी, गुगल जेमिनाय वगैरे तरुण मुले जोरात वापरू लागले आहेत. त्यांचे शाळा-कॉलेजांचे प्रोजेक्ट्स त्यांच्याच आधारे पूर्ण करू लागले आहेत. आता कोणतीही गोष्ट लक्षात ठेवण्याची गरजच राहिलेली नाही. चॅट जीपीटी, डीपसीक इत्यादींना विचारले की झाले अशी अवस्था आहे. भारताला स्वातंत्र्य कधी मिळाले हेदेखील बहुदा तरुण पोरे आता एआयला विचारूनच सांगतील की काय असे वाटते. अर्थात, भारताला आतापर्यंत बरीच स्वातंत्र्ये मिळाली आहेत. काहींच्या मते आणीबाणीनंतर मिळाले ते दुसरे स्वातंत्र्य होते. तर २०१४ मध्ये नरेंद्र मोदी घेऊन आले तोच खरा स्वातंत्र्याचा कलश होता असे म्हणणाऱ्या कंगना रनौट व इतरांची संख्याही तशी कमी नाही. किंबहुना, आता मुळी जमानाच यांचा आहे. त्यामुळे एआयचाही कदाचित गोंधळ उडू शकेल. थोडक्यात, चॅट जीपीटीचा देखील गोंधळ उडवून देण्याचे सामर्थ्य अजूनही भारत राखून आहे. म्हणजे २०२६ आले तरीही म्हटले तर काहीच फारसे बदलले नाही असेही काहींना वाटू शकेल.

## आशा आणि अपेक्षा

पण हे काही लोक सोडले तर बाकीच्या सर्वसामान्यांना या नवीन वर्षात अनेक गोष्टी बदलाव्या असे नक्कीच वाटेल. कालपरवा महापालिकेत झाला तसा निवडणुकीचा तमाशा पुन्हा जिल्हा परिषद, पंचायत समितीत देखील होणार काय या कल्पनेने ग्रामीण भागातले लोक चिंतेत असतील. प्रस्थापित, शिस्तबध्द इत्यादी म्हणवणाऱ्या राजकीय पक्षांनी व नेत्यांनी थोडी तरी लाज बाळगावी असे ते म्हणतील. पैसे घेऊन तिकिटे न देता, वर्षानुवर्ष काम केलेल्यांच्या कामाचे चीज करावे अशीच सर्वांची भावना असेल. दुसरे म्हणजे इतक्या मारामाऱ्या व कोट्यवधी रुपये खर्चून जे निवडून येतील त्यांनी रस्ते, पाणी, कचरा उचलणे इत्यादी मूलभूत बाबतीत किमान दिलासा द्यावा, बेकायदा बांधकामे करू नयेत, स्थानिक गुंडगिरी आणि सरकारी कार्यालयांमधल्या भ्रष्टाचाराला चाप लावावा अशीही त्यांच्या साध्यासुध्या इच्छा असतील. दिल्लीत मोदी आणि मुंबईत फडणवीस यांची राजवट आल्यापासून विरोधी पक्षांना काही किंमतच उरलेली नाही. त्यांच्यात फोडाफोड्या करणे, संशयास्पद रीतीने निवडणुका जिंकणे, लाडकी बहीणासारख्या योजनांमधून पैसे वाटून मतदारांना भ्रमित करणे असे प्रकार सर्रास घडताहेत. ते निदान या २०२६ मध्ये तरी थांबावेत. हिंदू विरुध्द मुस्लिम असे वाद लावून सतत मुस्लिमांविरुध्द विष ओकत राहणे हेही आता बंद करावे आणि देशातले रोजगार, महागाई यासारख्या खऱ्या प्रश्नांकडे लक्ष द्यावे अशी लोकांची भाजपकडे प्रार्थना असेल. महाराष्ट्रात एमपीएससीच्या परीक्षा वेळच्या वेळी व्हाव्यात व त्यांचे निकालही वेळेवर लागावेत. यंदा अर्ज करण्यासाठी वयोमर्यादा शिथील करण्याची वेळ आली. तसे पुन्हा होऊ नये. राज्यातल्या कॉलेजांमध्ये अकरावीचे प्रवेश परवा नोव्हेंबरपर्यंत चालू होते. यंदापासून हे होऊ नये. याला काहीतरी शिस्त लागावी. यंदा पहिल्या दोन महिन्यांमध्ये सर्व निवडणुका संपतील. त्यानंतर तरी फडणवीस, शिंदे व दादा यांनी राज्याच्या आर्थिक स्थितीची श्वेतपत्रिका मांडावी. आपल्या नालायकीमुळे तिजोरीत खडखडाट झाला आहे याची कबुली द्यावी. गरज पडल्यास लाडकी बहीणसारख्या योजना काही काळ स्थगित ठेवाव्यात. जनतेनेही फुकट मिळते आहे म्हणून असल्या लोकांच्या मागे जाऊ नये. शेवटी हा सौदा आपल्याच जिवावर उठतो. दुसरीकडे फडणवीस आणि मंडळींनी शक्तिपीठ, नाणार, धारावी यासारख्या बिल्डर, कंत्राटदार व अदानीसारख्यांची धन करणाऱ्या योजना आता बंद कराव्यात. जनतेच्या खऱ्याखुऱ्या भल्याचा विचार करावा. जनतेनेही आता निव्वळ निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावणे एवढेच आपले कर्तव्य आहे असे मानू नये. रोजच्या आयुष्यात थोडे अधिक सजग व्हावे. सत्ताधाऱ्यांना जाब विचारावा. सर्वांना नवीन वर्षाच्या कृषीवल परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा.

**विचार**

# २०२५ मध्ये... नोंद घेण्याजोगे

*२०२५ मध्ये देश आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक महत्त्वपूर्ण घटना घडल्या. आंतरराष्ट्रीय संबंध ढवळून निघताना दिसले. युद्ध वा युद्धजन्य स्थिती यंदाही कायम होती. ट्रम्प महोदयांच्या काही निर्णयांनी तसेच वक्तव्यांनी जगाची झोप उडवलेली दिसली. या सगळ्या घडामोडींचे परिणाम आगामी काळातही बघायला मिळणार आहेत. हे बदल जग कसे स्विकारणार याचा हा धावता आढावा.*




**डॉ. भालचंद्र कानगो**

२०२५ ला निरोप देत २०२६ चे स्वागत करताना अनेक गोष्टींची उजळणी होणे गरजेचे ठरते. अर्थातच त्यातील एक भाग आंतरराष्ट्रीय राजकारणाचा आहे. हा काळ या पातळीवरील राजकारणात झपाट्याने बदल बघायला मिळण्याचा आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर युरोप आणि अमेरिका जवळपास एकसारखे बोलायचे आणि वागायचे. ते रशियाच्या विरोधात होते. पण आता अमेरिकेने धोरण बदललेले दिसत असून युरोपला वाऱ्यावर सोडल्यासारखी स्थिती आहे. सध्या युक्रेन जगाचे लक्ष वेधून घेणारा देश बनला आहे. युक्रेनने नाटोमध्ये प्रवेश करावा की नाही या मुद्द्यावर भांडण होऊन शेवटी रशियाने त्यांच्यावर हल्ला केला. आता अमेरिका रशियाच्या मागे उभी राहिली आहे तर युरोप युक्रेनच्या बाजूने उभे राहण्याच्या मताचा आहे. हा मुद्दा नोंद घेण्याजोगा म्हणावा लागेल.

अमेरिकेचे आयात शुल्क हा सरत्या वर्षातील महत्त्वाचा विषय ठरला. अमेरिकेने भारतावरही मजबूत आयात कर लावला. खेरीज, भारत-रशिया संबंधांमध्ये वितुष्ट आणण्याचेही त्यांचे प्रयत्न आहेत. याचाच एक भाग म्हणून भारताने रशियाकडून तेल खरेदी करण्यावर अंकुश ठेवण्याचा विचार बोलून दाखवला गेला आहे. अर्थात भारताने धमकीला न जुमानता वेगळ्या मार्गाने रशियाकडून तेल खरेदी सुरूच ठेवली. मात्र याचा भारतातील जनतेला तेलाच्या किमती कमी होण्याच्या रुपाने कोणताही लाभ मिळाला नाही. अडाणी, अंबानींसारख्या उद्योगपतींना याचा खात्रीने फायदा होत आहे. त्यांच्या रिफायनरीला पैसे मिळत असल्यामुळे पेट्रोल निर्यात करुन हे समूह मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळवत आहेत. भारताच्या निर्यातरकमेच्या तालिकांमध्ये निर्यातवाढीचे हे आकडे दिसत आहेत. पण भारतीय जनतेला काहीही फायदा होत नसल्याचे २०२५ च्या आर्थिक घडामोडींमधून स्पष्ट होते.

भारतावर अमेरिकेचा वाढता दबाब २०२५ मध्ये प्रकर्षाने दिसून आला. याचे एक कारण म्हणजे 'ब्रिक्स'मध्ये चीन आणि रशिया हे देश मजबुतीने उभे आहेत. ब्राझील आणि दक्षिण आफ्रिकादेखील अमेरिकेच्या दबावाखाली येणार नाहीत. तेव्हा या गटातील भारत हा एकच देश अमेरिकेच्या दबावाखाली येण्याजोगा आहे. तसे बघायला गेले तर मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पूर्वीपासूनच अमेरिकेला अनुकूल राहिले आहेत. त्यातच अमेरिकेत स्थायिक झालेल्या, वास्तव्यास असणाऱ्या भारतीयांचे प्रमाणही प्रचंड आहे. तेदेखील भारताने अमेरिकेला अनुकूल भूमिका घेण्याच्या मताचे आहेत. त्यामुळेच अमेरिका भारतावर इतका दबाव निर्माण करत असूनही मोदी शांत आहेत. वाढते आयात शुल्क असो, भारत आणि पाकिस्तानमध्ये शस्त्रसंधी आणि शांतता मी आणली, हे वक्तव्य असो वा यासारखी अन्य मुक्ताफळे असोत; मोदी अजूनही शांतच आहेत. लवकरच या दोन्ही देशांदरम्यान व्यापार करार होऊ घातला असून त्याचीही चर्चा आहे. त्यामुळेच येत्या काळात आंतरराष्ट्रीय पातळीवर या दोन देशांच्या संबंधांकडे जगाचे लक्ष राहणार यात शंका नाही.

या सगळ्या बदलाच्या स्थितीमध्ये भारताने आपली ताकद ओळखणे गरजेचे आहे, असे वाटते. चीननंतर सर्वात मोठी अर्थव्यवस्था असणारा एकमेव देश म्हणजे भारत. पण एका अर्थाने तो परावलंबी आहे, हेदेखील विसरुन चालणार नाही. नवीन आर्थिक धोरण आल्यानंतर तर परकीय चलनासाठी भारताचे पाश्चात्य देशांवरील अवलंबित्व कमालीचे वाढले आहे. १९८४ च्या आधीचा भारत आत्मनिर्भरतेकडे प्रवास करणारा होता. बदलत्या धोरणांमुळे आता तो अडचणीत सापडला आहे. स्वातंत्र्यानंतर भारतीय उद्योगपतींनी स्वत:ला शक्तिमान बनवले होते. मात्र आता तेच परदेशांमध्ये पैसे गुंतवण्यास प्राधान्य देत आहेत. म्हणजेच भारतात येणाऱ्या परकीय गुंतवणुकीपेक्षा गुंतवणुकीसाठी भारताबाहेर जाणाऱ्या पैशाचे प्रमाण अधिक आहे. अर्थातच यामुळे भारतीय धोरणांवर उद्योगपतींचा प्रभावही वाढतो आहे. दुसरीकडे, अडाणींच्या मार्फत पाश्चात्य देश भारतातील उद्योगविश्व कह्यात घेण्याच्या प्रयत्नात आहेत. येथील नैसर्गिक साधनसंपत्तीवर कब्जा करण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. ते येथे थेट काही करु शकत नसले तरी अडाणींच्या मार्फत हे काम सुरू आहे. असे असताना चीनबरोबरचा संघर्षही संपलेला नाही. चीनी साहित्यावर बहिष्कार टाकण्याची अधूनमधून होणारी घोषणा हा त्याचाच भाग म्हणावा लागेल. त्या दृष्टीने काही धोरणेही राबवली जातात. पण काहीही केले तरी भारताला चीनशी असणारे व्यापारी संबंध तोडणे शक्य नाही, हे २०२५ ने दाखवून दिले आहे. पुढेही हीच स्थिती कायम राहील. आता चीनकडून होणारी आयात जवळपास तीन ट्रिलियनच्या घरात पोहोचली आहे. मात्र तेवढी निर्यात नसल्याने तूट वाढते आहे. येत्या काळात ही काळजीची बाब राहणार आहे. आधी उल्लेख केल्याप्रमाणे भारतीय उद्योगपतींना अमेरिकेशी भारताचा दोस्ताना हवा आहे. त्यामुळेच सध्या चर्चेत असणारा करार भारताला अगत्याने हवा असल्याचे अमेरिका जाणते. दुसरीकडे अमेरिकेलाही होऊ घातलेल्या या करारात रस आहे, कारण दोन देशांमध्ये व्यापारी संबंध नेहमीच महत्त्वाचे असतात. अलिकडच्या काळात तर व्यापार हाच आंतरराष्ट्रीय संबंध ठरवण्यात, निर्माण करण्यात महत्त्वाचा भाग बनतो आहे. त्यामुळे आता नेहरुंच्या काळातील विचार वेगाने मागे पडणार यात शंका नाही. मूल्ये, विचारांची एकरुपता, साम्राज्यवाद विरोध हे सगळे विषय आता मागे पडले असून येता काळ व्यापारी संबंधांना महत्त्व येण्याचा असेल. उदाहरण द्यायचे तर आता इस्त्रायलशी आपले संरक्षण करार खूप वाढत आहेत. आपण त्यांना संरक्षण सामग्री देतो तर त्यांच्याकडून तंत्रज्ञान घेतो. हे नवीन धोरण आहे. पूर्वी असे नव्हते. इस्त्रायलचा मूळ संघर्ष मुस्लीम राष्ट्रांशी असल्याचे इथे विसरुन चालणार नाही. त्यामुळे हे धोरण बीजेपी आणि आरएसएसच्या निकषांमध्ये बसणारे आहे, असेही म्हणता येईल. म्हणजेच इस्त्रायलशी आर्थिक संबंध वाढवणे हा त्यांच्या नीतीचाही एक भाग आहे. पण त्याचा भारतावर दूरगामी परिणाम काय होईल, याचा विचार ते करत नाहीत. आजमितीला आपले एक कोटीपेक्षा जास्त लोक मुस्लीम देशांमध्ये काम करतात. त्यांच्याकडून आपल्याला प्रचंड प्रमाणात परकीय चलन मिळते. म्हणूनच सरकारने धोरणे राबवताना याचा विचार करणाची नितांत गरत जाणवते. आज जगातील प्रत्येक देशाला भारताशी व्यापारी संबंध हवे आहेत, कारण मोठी बाजारपेठ असणारा हा देश व्यापारवृद्धीसाठी आवश्यक आहे. हे मार्केट कोणीही गमावू इच्छित नाही. हे लक्षात घेऊनच येत्या वर्षातही आंतरराष्ट्रीय राजकारण आणि व्यापार धोरण आकार घेताना दिसेल. मात्र असे असले तरी इथेही लक्षात घ्यायला हवे की, तांत्रिकदृष्ट्या आपण आजही बहुराष्ट्रीय कंपन्यांवर अवलंबून आहोत. त्यांनी हात आखडायला सुरूवात केली आणि आपल्याला तंत्रज्ञान महाग पडू लागले, परिणाम विकास थांबला वा विकासाचा वेग मंदावला तर विपरित परिणाम भोगावा लागेल. पुन्हा एकदा अमेरिकेकडे वळायचे झाल्यास येत्या वर्षातही हा देश आपल्याला शक्य तितक्या अडचणीत आणण्याचा प्रयत्न करेल. भारतातील अमेरिकन गुंतवणूक कमी व्हावी, भारतीयांवरील आपले अवलंबित्व कमी व्हावे असा त्यांचा प्रयत्न असेल. केवळ भारतीयांवरीलच नव्हे, तर परकीयांवरील अवलंबित्व कमी करण्याचा त्यांचा प्रयत्न बघायला मिळेल. पण इथेच त्यांच्या अडचणी वाढण्याचीही शक्यता आहे, कारण अमेरिका त्यांच्या मुक्त धोरणांमुळे आजच्या स्थितीत पोहोचला आहे. त्यामुळे हे धोरणच बदलले तर ते या स्थानी कधीच अढळ राहू शकणार नाहीत.

आज अमेरिकेची ताकद सैन्यशक्तीमध्ये दाटली आहे. याबाबत कोणताही देश त्यांचा मुकाबला करु शकत नाही. त्यामुळेच या बळावर हा देश जगावर युद्धखोरी लादण्याची भीती वाटते. परिणामी, नवीन वर्षामध्ये छोटी-छोटी युद्धे वाढू शकतात. आफ्रिका, दक्षिण आशियात ही स्थिती बघायला मिळू शकते. थायलंड आणि कंबोडियामध्ये आताच युद्ध सुरू झाले आहे. हे लोण पसरण्याचा धोका नाकारता येत नाही. चीन, रशिया आणि अमेरिका यांची जवळीक हादेखील जगाच्या दृष्टीने वेगळे राजकारण दाखवणारा विषय ठरु शकतो. चीन आणि रशिया एकमेकांच्या बरेच जवळ येताना दिसल्यास नवल वाटायला नको. भारताच्या दृष्टीने बघायचे तर अमेरिकेच्या जास्त जवळ जाणे धोक्याचे ठरेल. म्हणूनच आपण येत्या काळात रशिया आणि चीन यांच्याशी संतुलित संबंध राखण्याचा प्रयत्न करत राहताना दिसू.

# राजकीय प्रश्नोत्तराचे राहील नवे वर्ष

**सुयोग आंग्रे**

पुढील वर्ष देशाची राजकीय घडामोडी ठरविण्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. पुढील वर्षी बंगाल, आसाम, तामिळनाडू, केरळ आणि पुद्दुचेरीमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत, ज्यामध्ये सर्वच पक्षांचे काहीतरी पणाला लागले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका म्हणजेच बीएमसी या सर्वात श्रीमंत महापालिकांसाठीही निवडणुका होणार आहेत. राज्यसभेच्या काही जागा रिकाम्या झाल्या, तर पक्षांतर्गत भांडण होऊ शकते. पुढील वर्षी अनेक राजकीय कोडीही सुटणार आहेत. उदाहरणार्थ, देशभरात मोठ्या प्रमाणावर विस्तार झालेला भाजप राजकीयदृष्ट्या नापीक ठरत असलेल्या राज्यांमध्ये स्वत:साठी अनुकूल परिस्थिती निर्माण करून आपला शिरकाव वाढवू शकेल का? भारत जोडो यात्रेनंतर पुन्हा रुळावर आलेले काँग्रेसचे वाहन पुन्हा रुळावर येणार की नाही? अस्तित्वाच्या संकटात सापडलेल्या डाव्या पक्षांना त्यांचा शेवटचा सत्तेचा बालेकिल्ला वाचवता येणार आहे की नाही? प्रादेशिक पक्ष काय नियत साध्य करतील? असे अनेक राजकीय प्रश्न आपली उत्तरे मतदार राजाच्या सानिध्यात जाऊन शोधताना दिसणार आहेत. भाजपबद्दल बोलायचे झाले तर, विधानसभा निवडणुकांमुळे नवीन क्षेत्रांमध्ये प्रवेश करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना कितपत यश मिळेल? ज्या राज्यांमध्ये निवडणुका होणार आहेत, तेथे फक्त आसाममध्ये त्यांचे सरकार आहे आणि पुद्दुचेरीमध्ये त्यांच्या पाठिंब्याचे सरकार सत्तेवर आहे. दहा वर्षांपासून सत्तेत असलेल्या आसाममध्ये भाजप पुन्हा सत्तेत येण्याची दाट शक्यता आहे, मात्र यावेळी गौरव गोगोई यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसचे कडवे आव्हान आहे हे निश्चित.

काँग्रेसने राजकीय कौशल्य दाखवले तर भाजपची समीकरणे बिघडू शकतात. बंगालमध्ये सर्व प्रयत्न करूनही पक्ष दुसऱ्या क्रमांकावर अडकला आहे. केरळच्या द्विध्रुवीय राजकारणात भाजपचा सध्या तिसरा ध्रुव बनण्यावर भर आहे. तिरुअनंतपुरमच्या नागरी निवडणुकीतील विजयाने थोडे का होईना पण बळ आणि धैर्य दिले आहे. अशा स्थितीत विधानसभा निवडणुकीत पक्ष आपले आव्हान किती तगडेपणे मांडतो, हे पाहावे लागेल. आगामी वर्ष काँग्रेससाठी कमी आव्हानात्मक असणार नाही. आसाममध्ये पुनरागमन करण्याची आशा बाळगणाऱ्या काँग्रेसने बंगालमध्ये जवळपास मजल मारली आहे. तामिळनाडूमध्ये त्या द्रमुकच्या साथीदार झाल्या आहेत. पक्षाच्या खऱ्या आशा केरळशी जोडल्या गेल्या आहेत, जिथे ते डाव्या पक्षांकडून सत्ता हिसकावून घेण्याची रणनीती बनवण्यात व्यस्त आहे. नुकत्याच झालेल्या नागरी निवडणुकीत पक्षाला अपेक्षित यश मिळाल्याने त्यांच्यासाठी अनुकूल चिन्हे आहेत.

मात्र, यापूर्वी अनेक निवडणुकांमध्ये जिंकलेली लढाई हरण्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या काँग्रेसला केरळमध्येही कमी अडचणींचा सामना करावा लागत आहे. पक्षात नेतृत्वावरून वादाची परिस्थिती आहे. डाव्या पक्षांसाठीही पुढील वर्ष जगण्याच्या प्रश्नाशी संबंधित आहे. बंगाल आणि त्रिपुरामध्ये प्रदीर्घ काळ सत्तेत असलेले डावे पक्ष आता या दोन राज्यात राजकीय वनवास भोगत आहेत. केरळमध्येही त्यांनी सत्ता सोडली तर त्यांना काहीही उरणार नाही. ज्या वेळी या विचारसरणीला भारतात येऊन शंभर वर्षे पूर्ण झाली आहेत, अशा वेळी शक्तीहीनतेची अशी संभाव्य परिस्थिती तिच्या वैचारिक प्रासंगिकतेवरच प्रश्न निर्माण करेल. पुढील वर्ष इतर काही प्रादेशिक क्षत्रपांसाठी देखील बरेच काही निश्चित करेल. बंगालमध्ये तृणमूल ज्या उत्साहाने वावरत आहे, त्याचा राजकीय फायदा प्रतिस्पर्धी भाजपला सहजासहजी होऊ देत नाही. मात्र, भाजप ज्या रणनीती आणि साधनसामुग्रीच्या सहाय्याने निवडणूक लढवते ते पाहता ममता बॅनर्जी यांच्यासाठीही हा मार्ग सोपा असणार नाही.

जयललिता यांच्या निधनानंतर राज्यात निर्माण झालेली राजकीय पोकळी अद्याप भरून निघालेली नसल्यामुळे तामिळनाडूतील द्रमुकचा बालेकिल्ला काहीसा अभेद्य वाटत आहे. अण्णाद्रमुकमधील अंतर्गत भांडणामुळे मुख्यमंत्री स्टॅलिन यांचेही काम सोपे झाले आहे. मात्र, इतक्या वर्षांच्या सत्ताविरोधी प्रवृत्तींमुळे विरोधी आघाडीत आलेली नवी ऊर्जा आणि भाजपच्या एकत्रित प्रयत्नांमुळे स्टॅलिनपुढील आव्हान निश्चितच वाढणार आहे. अभिनेत्यातून नेता म्हणून प्रस्थापित होऊ पाहणाऱ्या विजयचा पक्ष काही जागांवर खेळही बिघडू शकतो. महाराष्ट्रातील बीएमसी निवडणुकीत ठाकरे कुटुंबाची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे. प्रदीर्घ काळानंतर एकत्र आलेले उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांना एकत्र यश मिळू शकले नाही, तर त्यांचे राजकीय भवितव्य अधांतरीच अडकणार आहे. निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही सलोखा सुरू आहे, पण त्यातून काय साध्य होणार? पुढील वर्ष अशा सर्व प्रश्नांची उत्तरे घेऊन येईल.

**लोकसंसद**

## नवीन वर्षातील संकल्प तडीस न्यावेत!

२०२५ हे वर्ष कडूगोड आठवणी मागे सोडून जात असताना, या वर्षातील नकारात्मक गोष्टींना तिलांजली देऊन चांगल्या गोष्टींना उजाळा देत, मनात नवी स्वप्ने, नव्या आशा, नव्या आकांशा, नवी उमेद व नाविन्याची कास धरत नव्या जोमाने २०२६ या नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी सर्वसामान्य जनता सिद्ध झाली आहे. आयुष्यातील आणखी एक वर्ष मागे सरून पुढे जात असताना अनेक आठवणी, भलेबुरे अनुभव लक्षात घेऊन आपले जीवनमान अधिकाधिक सुकर कसे होईल यासाठी या वर्षाकडे सकारात्मक दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. तरुणाईचे, महिलांचे, विद्यार्थ्यांचे, ज्येष्ठ नागरिकांचे, प्रत्येकाचे नव्या वर्षातील वेगवेगवेगळे संकल्प! कोणी व्यायाम आणि डाएट करण्याचा, वजन घटविण्याचा संकल्प करतो, कोणी भरपूर अभ्यास करण्याचा, वाचन करण्याचा संकल्प करतो तर ज्येष्ठ नागरिक देश, विदेशात कुठे भ्रमंती करायची त्याची योजना आखतात. नवीन वर्षासाठी केलेले बहुतांश संकल्प, नवीन वर्षाचे नावीन्य संपल्यावर जानेवारीच्या मध्यापर्यंत गळून पडतात. त्यामुळे प्रत्येकाने नवीन वर्षातील संकल्प शेवटपर्यंत तडीस नेण्याचा प्रयत्न गांभीर्याने केला पाहिजे. सर्वांना २०२६ हे वर्ष सुख, समाधानाचे जावो हीच सदिच्छा!

**– प्रदीप मोरे, अंधेरी**

## भारताचे दैदिप्यमान यश

२०२५ साल संपता संपता एक मोठी घडामोड होत आहे. भारताने जपानला मागे टाकत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था बनण्याचा मोठा बहुमान पटकावला आहे. जगाच्या इतिहासात हा नवा इतिहास रचला आहे भारताचा जी डी पी ४.१८ ट्रिलियन डॉलर्स वर पोहचला आहे. आता या पुढील लक्ष जगातील तिसरी अर्थव्यवस्था बनण्याचे आहे. २०३० पर्यंत भारत जर्मनीला मागे टाकेल; असा अंदाज केंद्र सरकारने व्यक्त केला आहे. आता जागतिक अर्थव्यवस्थेची क्रमवारी अमेरिका, चीन, जर्मनी, भारत व जपान अशी आहे. विशेष म्हणजे भारताची अर्थव्यवस्था जगात सर्वात वेगवान असणारी अर्थव्यवस्था ठरली आहे. या मुदतीत महागाई दर मर्यादित राहिला असून देशातील बेरोजगारीचे प्रमाण सुद्धा कमी होत आहे. वाढलेली देशांतर्गत मागणी व ठोस संरचनात्मक सुधारणांमुळे हे यश मिळाल्याचे केंद्र सरकारने नमूद केले आहे एकूणच हे अर्थव्यवस्थेचे यश म्हणजे मोदी सरकारची मोठी उपलब्धी आहे. **– शांताराम वाघ, पुणे**

**विशेष**

# निरोप आणि स्वागत- नव्या वर्षाकडे सकारात्मक प्रवास...

वर्ष येतं, वर्ष जातं. जुन्याला निरोप देत नव्याचं स्वागत करणं हाच निसर्गाचा स्वभाव आणि हाच जीवनाचा खरा प्रवास आहे.



निसर्ग कधी थांबत नाही, कधी मागे वळून पाहत नाही. जे गेलं, त्याचा खेद करत बसत नाही; तो नव्याला सामोरा जात पुढे सरकत राहतो. जे नष्ट झालं, त्यातून नव्या आशेने नव्या निर्मितीचा प्रयत्न करतो. दिवसाच्या शेवटी दिसणारा सूर्यास्त आपल्याला हेच शिकवतो. प्रत्येक शेवट हा थांबा नसतो, तर एका नव्या सुरुवातीची शांत चाहूल असते. आजचे रंग, आजचं आकाश, आजचा क्षण उद्या पुन्हा तसाच मिळणार नाही. बदल हा अटळ आहे आणि तोच जीवनाचा सौंदर्यबिंदू आहे. आज सूर्यास्त होतो, तसा उद्या नवा दिवस उगवतो. जुन्याला निरोप देऊन नव्याचा स्वीकार करणं हाच खरा चैतन्याचा प्रवास, हेच जीवन आहे. बदल कधीच अचानक घडत नाही. तो हळूहळू, शांतपणे आणि प्रामाणिकपणे आतून सुरू होतो. प्रवासात शंका येतात, अडचणी येतात, थांबे येतात, प्रश्न अनुत्तरित राहतात. पण जेव्हा आपण अपेक्षांचा भार खाली ठेवतो आणि मागे न पाहता पुढे चालायला सुरुवात करतो, तेव्हा मार्ग आपोआप सापडू लागतो. सातत्य आणि अविरत प्रवास हेच या प्रवासाचे खरे रहस्य आहे. निसर्ग आपल्याला शिकवतो जे अस्थिर आहे ते बदलतं, जे ओझं आहे ते गळून पडतं आणि जे खरं आहे ते हळूहळू मुळं धरतं. या प्रवासात माणूस बदलतो, घडतो, अधिक समजूतदार होतो. वर्षाच्या सुरुवातीला जो असतो, तो वर्षाच्या शेवटी तसाच राहत नाही आणि तेच खरं वाढणं, प्रगल्भ होणं आहे. जीवनात नाती, अनुभव, भावना, माया, संपत्ती, परिस्थिती, पद, प्रतिष्ठा, आनंद, दुःख काहीच कायमचं नसतं. ही जाणीव झाली की विरक्ती कटुतेची राहत नाही; ती स्वीकाराची बनते. भीती कमी होते आणि पुढे जाण्याची ताकद वाढते. जे जसं आहे, ते तसं स्वीकारण्याची क्षमता वाढली की प्रवास अधिक सहज होतो. शांतपणे सोडून देत पुढे जाणे हेच खरे जीवन आहे. या प्रवासाला घाईची गरज नसते; त्याला फक्त उपस्थिती, प्रत्यक्ष सहभाग आणि अविरत सातत्याची गरज असते. निसर्ग जसा सकारात्मक राहून, गेलेल्याचा खेद न करता, नव्याचं स्वागत करत पुढे सरकत राहतो, तसाच सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपणही येणाऱ्या नव्या वर्षाचं स्वागत करूया. जे गेलं ते सन्मानाने सोडूया आणि जे येत आहे त्याला आशा, विश्वास आणि शांत आत्मविश्वासाने सामोरं जाऊया. २०२५ ला निरोप देताना त्याने दिलेल्या प्रत्येक अनुभवाबद्दल कृतज्ञता व्यक्त करूया शिकवण, शांतता, स्पष्टता आणि आतून सुरू झालेला बदल स्वीकारून पुढे चालत राहूया. २०२६ चं स्वागत करताना विश्वास, दिशा आणि सकारात्मक ऊर्जा घेऊन पुढे पाऊल टाकूया. प्रत्येक सूर्यास्त एका नव्या उषःकालाची जाणीव करून देतो. अंत नव्या आरंभाची चाहूल असतो. येणारा प्रत्येक दिवस नवीन संधी घेऊन येतो. जुन्या क्षणांची किमया जतन करा, नवीन अनुभवांचा आनंद घ्या आणि स्वतःवर तसेच इतरांवर विश्वास ठेवत पुढे चालत राहा. तेव्हाच प्रवास हलका, सुंदर आणि अर्थपूर्ण होईल. प्रत्येक क्षण अमूल्य आहे. येणाऱ्या नव्या वर्षाचे स्वागत करूया आशा, विश्वास आणि सकारात्मक ऊर्जेसह पुढे पाऊल टाकूया. खेद आणि खंत बाजूला ठेवून, आनंद आणि उत्साहाने, निसर्गासोबत बदल स्वीकारत सहज पुढे चालत राहूया. नव्या वर्षात प्रत्येकास नवी संधी, नवे अनुभव आणि सकारात्मक ऊर्जा लाभो. जीवनाचा प्रवास अधिक अर्थपूर्ण, हलका आणि सुंदर होवो. जुन्याला सन्मानाने निरोप देऊ आणि नव्याचे आनंदाने स्वागत करूयात; चैतन्याचा प्रवास अविरत चालू ठेऊ.

**– मनिषा नाईक**
**संस्थापक अध्यक्ष व कार्यकारी व्यवस्थापक सेवांगण फाउंडेशन**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

### १ जानेवारी

१) श्री.लक्ष्मण माणिक म्हात्रे नागडोंगरी, अलिबाग १-१-१९४२
२) श्री. यशवंत हिरू पाटील मु.सुतारपाडा, अलिबाग, १-१-१९४०
३) श्री.सुरेश विष्णू देसाई विद्यानगर, अलिबाग १-१-१९४३
४) श्री.नारायण मोरश्वर वार्डे मु.वेश्वी, अलिबाग १-१-१९४२
५) श्री.द्वारकानाथ मुकुंद गाडे वरसोली, अलिबाग १-१-१९४७
६) श्रीम.छाया चंद्रकांत म्हात्रे पंतनगर, अलिबाग १-१-१९४५
७) श्रीम.वंदना मनोहर राऊत मु.नवेदर-नवगाव, अलिबाग १-१-१९४८
८) श्री.गजानन नारायण गावडे अलिबाग, १-१-१९४८
९) श्रीम.उत्तमा शरद मयेकर मु.किहीम, अलिबाग १-१-१९४७
१०) श्रीम.वंदना चंद्रकांत घरत मु.नवेदर, अलिबाग १-१-१९५१
११) श्रीम.सुप्रिया सुर्यकांत टिळू थळ, अलिबाग, १-१-१९५५
१२) श्री.सहदेव काशिनाथ म्हात्रे कोळीवाडा, अलिबाग १-१-१९४७
१३) श्रीम.सुनिता सदानंद ठाकूर मु.किहीम, अलिबाग १-१-१९४१
१४) श्रीम.वंदना पुरूषोत्तम सरपाटील अलिबाग १-१-१९४३
१५) श्रीमती शैला परशुराम दाबके कुंट्यांची गोठी, अलिबाग १-१-१९४२
१६) श्री.विश्वनाथ लक्ष्मण पेरेकर कोळीवाडा, अलिबाग १-१-१९६१
१७) श्रीम.प्रिया दिलीप पांडरपट्टे चेंढरे, अलिबाग १-१-१९६३
१८) श्री.कलमप्रसाद राजबली जयस्वाल चेंढरे, अलिबाग १-१-१९५२
१९) शालिनी शरद म्हात्रे वरसोली, अलिबाग १-१-१९५६
२०) दिलीप दादू माळवी धोकवडे, अलिबाग १-१-१९६५
२१) कमलाबाई छगनलाल ओसवाल अलिबाग, १-१-१९५३
२२) मंजूळा सोनमल जैन अलिबाग १-१-१९४७
२३) ललिता रमेश जैन अलिबाग १-१-१९५९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचाफोटोकृषीवलमध्येछापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**कै. कस्तुरी परशुराम पडते**

# अखेर आठ महिन्यांनंतर गर्वांगला मिळाला न्याय

## दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

**म्हसळा येथील १४ वर्षीय शाळकरी मुलगा गर्वांग दिनेश गायकर याच्या दुर्दैवी मृत्यूप्रकरणी तब्बल आठ महिन्यांनंतर न्यायाचा मार्ग मोकळा झाला आहे. उपचारात निष्काळजीपणा केल्याप्रकरणी उपजिल्हा रुग्णालय माणगाव आणि म्हसळा येथील दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांवर अखेर म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

म्हसळा न्यू इंग्लिश स्कूलमध्ये इयत्ता ८ वीमध्ये शिक्षण घेणाऱ्या गर्वांग यास दि. ४ एप्रिल रोजी ताप आल्याने त्याचे वडील दिनेश गायकर व चुलते सुरेश गायकर यांनी प्रथम ग्रामीण रुग्णालय म्हसळा येथे उपचारासाठी दाखल केले. त्यानंतर पुन्हा ताप वाढल्याने त्यास ग्रामीण रुग्णालय म्हसळा येथून उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले.



मात्र माणगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात संबंधित डॉक्टरांनी ना योग्य उपचार केले, ना रुग्णालयात दाखल करून घेतले. उपचाराअभावी कुटुंबीयांनी गर्वांग यास परत घुम येथे घेऊन जाण्याची वेळ आली. मात्र ताप न उतरल्याने दि.६ एप्रिल रोजी सकाळी पुन्हा ग्रामीण रुग्णालय म्हसळा येथे दाखल केले असता सकाळी ८.५४ वाजता डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. या घटनेनंतर म्हसळा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती.

सदर प्रकरणाचा सखोल तपास पोलीस उपनिरीक्षक एस.पी. रोहिणकर यांनी, स.पो.नि.रविंद्र पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली केला. तपासादरम्यान जिल्हा रुग्णालय अलिबाग रायगड येथील तज्ज्ञ समितीने सादर केलेल्या अहवालात उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथील डॉ.अभिषेक रापते व डॉ.नितिश सावंत यांनी उपचारात गंभीर निष्काळजीपणा केल्याचे स्पष्ट झाले आहे. या अहवालाच्या आधारे मृत मुलाचे वडील दिनेश गायकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार म्हसळा पोलीस ठाण्यात दि.३० डिसेंबर २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे पोलिस निरीक्षक रवींद्र पारखे यांनी वार्तालाप करताना सांगितले. या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली स. पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे व पोलीस उपनिरीक्षक एस. पी. रोहिणकर करीत आहेत.

एका निष्पाप शाळकरी मुलाच्या मृत्यूने म्हसळा तालुका हादरून गेला होता. तब्बल आठ महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर दोषींवर कारवाई सुरू झाल्याने गर्वांगच्या कुटुंबीयांना आणि ग्रामस्थांना दिलासा मिळाला आहे. आरोग्य यंत्रणेच्या हलगर्जीपणावर कठोर कारवाईची मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे.

## ऑडिओ गाईड क्यूआर कोडचे उद्घाटन



### • स्कॅनरद्वारे पर्यटकांना मिळणार माहिती

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा तालुक्यातील ऐतिहासिक प्राचीन कुडा लेण्यांविषयी माहिती देणाऱ्या ऑडिओ गाईड क्यूआर कोडचे उद्घाटन भारतीय पुरातत्व विभाग नवी दिल्ली डायरेक्टर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी भारतीय पुरातत्त्व विभाग नवी दिल्लीचे डायरेक्टर, मुंबई सर्कलचे अधीक्षक अभिजीत आंबेकर, मुरुड जंजिरा उप मंडळचे अधिकारी बजरंग येलीकर, येलीकर तसेच कर्मचारी, पर्यटक उपस्थित होते. कुडे लेणीला भेट देणाऱ्या पर्यटकांना लेण्यांविषयी माहिती मिळावी याकरिता भारतीय पुरातत्व विभागाने क्यूआर कोड स्कॅनर ऑडिओ गाईडची सुविधा हिंदी आणि इंग्रजी भाषेमध्ये पर्यटकांना उपलब्ध करून दिली आहे. पर्यटकांनी क्यूआर कोड स्कॅन करून मोबाईल फोनमध्ये येणाऱ्या डॅशबोर्डवर मोबाईल नंबर समाविष्ट करून स्टार्ट ऑडिओ गाईड या बटनावर क्लिक केल्यावर लेण्यांविषयीची सविस्तर माहिती ऑडिओ स्वरूपात फोनमध्ये पर्यटकांना ऐकायला मिळणार आहे.

## निसर्ग शिबिरातून पर्यावरण संवर्धनाची जाणीव



**। सुधागडपाली । प्रतिनिधी ।**

सुधागड अभयारण्यातील कोंडगाव धरण परिसरात महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक वनीकरण विभाग, रायगड यांच्या वतीने पर्यावरण शिक्षण कार्यक्रमांतर्गत आत्मोन्नती विद्यालय, जांभूळपाडा येथील विद्यार्थ्यांसाठी निसर्ग शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरातून विद्यार्थ्यांना निसर्ग, वन्यजीव आणि जैवविविधतेचे प्रत्यक्ष अनुभव मिळाले. या उपक्रमासाठी सामाजिक वनीकरण सुधागडचे वनक्षेत्रपाल प्रशांत निकाळजे, वनपाल सुहास रणवरे, वनरक्षक राजेंद्र बेवनाळे, भास्कर पवार, अतुल अहिरे, पर्यवेक्षक विश्वास ढोपे तसेच वरिष्ठ शिक्षक वेत्रवान गुरव, सहायक शिक्षिका अंजना पिसे, मिलिंद शिंदे आणि शेखर राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. शिबिरात सहभागी ५० विद्यार्थ्यांसाठी कॅप, जेवण आणि ये-जा करण्याची व्यवस्था सामाजिक वनीकरण विभागाकडून करण्यात आली होती. विद्यालयाचे प्राचार्य आणि पालकवर्गाने या उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

शिबिरात भारतातील अग्रगण्य पर्यावरण व जैवविविधता संवर्धन संस्थेचे वन्यजीव अभ्यासक प्रशांत गोकर्णकर यांनी विद्यार्थ्यांना जंगलातील पक्ष्यांचे आवाज ओळखण्याचे प्रशिक्षण दिले. तसेच हिंस्त्र प्राण्यांचे जीवनचक्र, अधिवास, अन्नसाखळी आणि पर्यावरणातील त्यांचे महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली. जंगलात आढळणाऱ्या औषधी वनस्पतींचे प्रत्यक्ष दर्शन घडवून त्यांचे औषधी उपयोगही समजावून सांगण्यात आले.

या शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव, निसर्गाविषयी आदर आणि जैवविविधतेच्या जतनाची भावना निर्माण झाली.

# बसस्थानक स्वच्छतेसाठी विशेष मोहीम

## एसटी महाममंडळाचा सुरक्षित व आरोग्यदायी प्रवासासाठी पुढाकार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सर्व बस स्थानकांवर, परिसरात तसेच प्रशासकीय इमारतींमध्ये दर पंधरा दिवसांनी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. प्रवाशांच्या सुरक्षित व आरोग्यदायी प्रवासासाठी एसटी महामंडळाने पुढाकार घेतला आहे. एसटीची सकारात्मक प्रतिमा बळकट व्हावी, या उद्देशाने हा महत्वपूर्ण उपक्रम सुरू करण्यात येत असल्याची माहिती एसटी महामंडळाने जनसंपर्क कार्यालयामार्फत दिली आहे.



या मोहिमेअंतर्गत बस स्थानकातील बैठक व्यवस्था, भिंती, स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची ठिकाणे, महिला विश्रांतीगृहे, कार्यालयीन कक्ष आदींची सखोल स्वच्छता करण्यात येणार आहे. साचलेला कचरा, अनावश्यक झाडे झुडपे, जाहिरातींचे फलके, जाळी, जमट यांचे निर्मूलन करून परिसर अधिक स्वच्छ व सुंदर तसेच निटनेटका ठेवण्यावर भर दिला जाणार आहे. कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र डबे उपलब्ध करणे, कचऱ्याचे योग्य प्रकारे वर्गीकरण करून विल्हेवाट लावली जाणार आहे. प्रवासी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेतली जाणार आहे. पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी स्वच्छता व नियमित देखभाल ठेवण्याच्या सुचनाही देण्यात आल्या आहेत.

या अभियानासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संस्था, विद्यार्थी, नागरिक, एसटी महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी यांच्या सहभागातून ही मोहिम अधिक प्रभावी राबविण्यात येणार आहे. या मोहिमेची अंमलबजावणी काटेकोर होईल याची जबाबदारी विभाग प्रमुखांवर सोपविण्यात आली आहे. दर पंधरा दिवसांनी होणाऱ्या या मोहिमेमुळे बस स्थानके अधिक स्वच्छ, आरोग्यदायी व प्रवाशांसाठी आनंददायी ठरणार आहेत. प्रवासी सेवेमध्ये गुणवत्ता वाढीस मदत होणार आहे. या निर्णयामुळे प्रवाशांचा विश्वास अधिक दृढ होईल, असा विश्वास एसटी महामंडळाने व्यक्त केला असल्याची माहिती सहाय्यक जनसंपर्क अधिकारी रोहन देसाई यांनी दिली.

## कुत्र्यांची निर्बीजीकरण मोहीम लांबणीवर

**खेड :** शहरात मोकाट कुत्र्यांच्या वावराने नागरिक कमालीचे भयभीत झाले आहेत. अनेकदा अपघातही होत आहेत. या पार्श्वभूमीवर नगरपरिषद प्रशासनाने मोकाट कुत्र्यांच्या निर्बीजीकरणाची मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. नगरपरिषद हद्दीतील भटक्या कुत्र्यांना खाद्य घालण्यासाठी जागांची निश्चिती करण्यात आली आहे. या जागांवरच भटक्या कुत्र्यांना खायला देण्याबाबत नगरपरिषद प्रशासनाने फर्मान काढले आहे. निर्बीजीकरण मोहीमही राबविण्यात येणार होती. मात्र, नगरपरिषद निवडणुकीमुळे निर्बीजीकरणाच्या मोहिमेत अडथळा निर्माण झाला आहे.

## अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**सुकेळी :** नागोठणेजवळच असलेल्या सुकेळी आदिवासीवाडी येथे शुक्रवारी (दि.२) व शनिवार (दि.३) जानेवारी २०२६ रोजी अखंड विश्वशांती हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे. या दैनंदिन कार्यक्रमांमध्ये काकड आरती, ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन, हरीपाठ, किर्तन असे कार्यक्रम होणार आहेत. या कार्यक्रमाची सुरुवात गुरुवर्य हभप नारायणदादा महाराज अलिबागकर मठाधिपती पंढरपूर यांच्या शुभहस्ते घटस्थापना होईल. त्याचप्रमाणे शुक्रवार (दि.२) रोजी हभप बारकु महाराज वाघमारे यांचे प्रवचन तसेच हभप भरत महाराज अलिबागकर (वाजे) पंढरपूर यांची किर्तनसेवा होईल. शनिवार (दि.३) रोजी सकाळी ९.३० ते ११.३० वाजता गुरुवर्य हभप नारायणदादा अलिबागकर वाजे महाराज (मठाधिपती पंढरपूर) यांचे काल्याचे किर्तन झाल्यानंतर ग्रामस्थ मंडळ सुकेळी आदिवासीवाडी यांच्यातर्फे आलेल्या सर्व भाविकांना महाप्रसाद देऊन या भव्यदिव्य कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

# बिबट्या विषयक जनजागृती

### • चारशे विद्यार्थी, शिक्षकांनी घेतला लाभ

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गलगत असलेल्या राज्य शासनाच्या आद्य क्रांतिकारी वासुदेव बळवंत फडके औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागोठणे या संस्थेच्या मागील बाजूस असलेल्या झाडी झुडपातील परिसरात बिबट्या आल्याची माहिती चुकीची व बिनबुडाची ठरलेली घटना ताजी आहे. या पार्श्वभूमीवर वन खात्याच्या नागोठणे वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयामार्फत नागोठणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत बुधवार दि. ३१ डिसेंबर रोजी बिबट्याविषयक जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

वन खात्याच्या नागोठणे वनपरिक्षेत्र कार्यालयाचे वनपरिक्षेत्र अधिकारी दादासाहेब कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत घेण्यात आलेल्या या बिबट्याविषयक जनजागृती कार्यक्रमात रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट तसेच सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था यांच्या वतीने रेस्क्यू टीमचे सागर दहिंबेकर यांनी उपस्थित विद्यार्थी व शिक्षक यांना बिबट्या विषयक महत्त्वपूर्ण माहिती दिली. बिबट्या हा आपला काही दुश्मन नाही किंवा बिबट्याचे आपण दुश्मन नाही. बिबट्या हा उगीचच कोणावर हल्ला करीत नाही, अशा प्रकारची विविध बहुपयोगी माहिती एलसीडी स्क्रीनवर देऊन विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली.

## राज्यभरातून ११६७ कर्मचाऱ्यांची उपस्थिती | न्याय्य मागण्यांसाठी राज्यव्यापी आंदोलनाचा ठराव

# वीज कंत्राटी कामगारांचा ऐतिहासिक विजय मेळावा

**। उरण । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ (संलग्न : भारतीय मजदूर संघ) यांच्या वतीने वीज कंत्राटी कामगारांचा भव्य विजय मेळावा पुणे येथे मोठ्या उत्साहात पार पडला. ठाणे औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासिक निकालानुसार २२८५ वीज कंत्राटी कामगारांना कायम करण्याचा निर्णय झाल्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास राज्यभरातून सुमारे ११६७ वीज कंत्राटी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. रायगड जिल्ह्यातील कर्मचारी सुद्धा मोठ्या संख्येने उपस्थित होते.




यावेळी भारतीय मजदूर संघाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अनिल ढुमणे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, हा निकाल कंत्राटी कामगारांच्या हक्कांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असून संपूर्ण देशातील कंत्राटी कामगारांसाठी दिलासादायक ठरणारा आहे. वीज कंत्राटी कामगार संघाने रस्त्यावर उतरून केलेली आंदोलने, पुणेमुंबई पायी मोर्चा, मंत्रालयावर धडक मोर्चा, नागपूर येथे धडक मोर्चा तसेच संविधान चौकातील उपोषण या संघर्षांची त्यांनी विशेष दखल घेतली. यापुढे विविध उद्योगांतील कंत्राटी व असंघटित कामगारांना लेबर कोडमधील लाभ मिळवून देण्यासाठी संघटनेने अधिक प्रभावी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

ज्येष्ठ मार्गदर्शक अण्णाजी देसाई यांनी वीज उद्योगातील दीर्घकालीन कामगार चळवळीचा आढावा घेत कंत्राटी कामगारांसाठी संघटनेने मिळवलेली २०% व १९% वेतनवाढ तसेच नोकरी सुरक्षा (जॉब सेक्युरिटी) संदर्भातील प्रयत्न महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद केले आणि शासनाकडून यावर सकारात्मक निर्णय अपेक्षित असल्याचे मत व्यक्त केले. या मेळाव्यास भारतीय मजदूर संघाचे प्रदेश अध्यक्ष अनिल ढुमणे, ज्येष्ठ मार्गदर्शक अण्णाजी देसाई व ज्येष्ठ वकील विजय वैद्य हे प्रमुख वक्ते होते. राज्यसभा खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांनी उपस्थित राहून कामगारांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच, ऊर्जामंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे कामगारांच्या उर्वरित प्रश्नांबाबत पाठपुरावा करून न्याय मिळवून देण्याचा निर्धार व्यक्त केला. या मेळाव्यात संघटनेचे, अध्यक्ष निलेश खरात, कार्याध्यक्ष अमर लोहार, सरचिटणीस सचिन मेंगाळे, उपसरचिटणीस राहुल बोडके, संघटनमंत्री उमेश आणेराव, कोषाध्यक्ष सागर पवार यांनी संघटनेची आगामी दिशा व भूमिका स्पष्ट केली.

यावेळी वीज कामगारांच्या न्याय्य मागण्यांसाठी येत्या काळात राज्यव्यापी आंदोलन अधिक व्यापक स्वरूपात छेडण्याचा ठराव मेळाव्यात एकमताने मंजूर करण्यात आला.

## निवडक



## विवेक ढेपेंना पुरस्कार जाहीर

**माणगाव :** माणगाव येथील अष्टपैलू व्यक्तिमत्व तथा शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक कमाविलेल्या विवा कॉलेजचे प्राचार्य विवेक रमेश ढेपे यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला. या पुरस्काराचे वितरण शनिवार दि.३ जानेवारी २०२६ रोजी सायं. ५:३० वाजता मु.सातिर्जे, ता.अलिबाग या ठिकाणी होणाऱ्या भव्य दिव्य अशा कार्यक्रमात करण्यात येणार आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५व्या जयंतीनिमित्त सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, वैद्यकीय, सांस्कृतिक तसेच पत्रकारिता या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा दरवर्षी माजी आ.मधुशेठ ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट अलिबाग, भाई जगताप मित्रमंडळ रायगड, ॲड. उमेश ठाकूर मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कुलाबा जीवन गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात येतो. विवेक ढेपे हे विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांमध्ये उतरवून त्यांना प्रोत्साहित करीत असतात. ढेपे यांना शिक्षणाबरोबरच सामाजिक व क्रीडा क्षेत्राची विशेष आवड आहे. शिक्षणाबरोबरच सामाजिक कार्य करीत असताना रक्तदान शिबीर कार्यक्रमात त्यांचे विवा कॉलेज सक्रिय सहभाग देत असतात. त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन त्यांची राज्यस्तरीय कुलाबा जीवन गौरव पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

## रायगड विभागाचे नाटक प्रथम




**वाघ्रण :** सांगली केंद्रावर झालेल्या नाट्य स्पर्धेत रायगड विभागाचे ‘अजून अंधार दाटून आहे’ हे नाटक सर्व प्रथम आले. याचे लेखन व दिग्दर्शन विजयकुमार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी केले. तर निर्मिती सुहास चौरे (विभाग नियंत्रक, रायगड), सुत्रधार सुहास कांबळे (कामगार अधिकारी) विशेष सहाय्य संदिप शिंदे (यंत्र अभियंता, रायगड), प्रशांत खरे विभागीय वाहतूक अधिकारी यांनी विशेष सहकार्य केले. तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून राजन पांचाळ (सिनेअभिनेते, नाटककार), मिलन पाटील, विजया कुडव (सिने अभिनेत्री) यांचा समावेश आहे. या स्पर्धेत ठाणे, नाशिक, अकोला अशा नाट्य विभागाने सहभाग नोंदविला. यात रायगड विभागाच्या अजून अंधार दाटून आहे या नाटकाचा प्रथम क्रमांक आला. तर दिग्दर्शनमध्ये विजयकुमार म्हात्रे प्रथम, पुरुष अभिनयामध्ये रेश कृष्णा ठाकूर प्रथम, स्त्री अभिनयात द्वितीय क्रमांक ज्योती निलेश ठाकूर यांनी पटकावला. नेपथ्य प्रथम क्रमांक तर मंगेश बबन सानप, राकेश चंद्रकांत पाटील, अमृत कृष्णा पाटील यांना विजेते पदाची बक्षीस प्राप्त झाली आहेत.

## जानकीबाई शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन

**चिरनेर :** आवरे येथील जानकीबाई जनार्दन ठाकूर या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. नृत्याबरोबर विविध कलागुणांच्या माध्यमातून, विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराला व्यासपीठ मिळावे, हा यामागचा उद्देश होता. यावेळी नृत्यअविष्कारात कोळीगीते, आगरी नृत्यगीते तसेच हिंदी, पंजाबी लोकगीतांवर विद्यार्थ्यांचे पाय थिरकले. प्रारंभी संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष स्वर्गीय अशोक ठाकूर यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन माजी आमदार मनोहर भोईर यांच्या हस्ते झाले. यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. व्यासपीठावर निर्मला घरत, श्रीकांत ठाकूर, निराबाई पाटील, धिरेंद्र ठाकूर, मधुकर ठाकूर, कौशिक ठाकूर, सुनील वर्तक, संतोष पाटील, प्रमोद म्हात्रे, निवास गावंड, निकिता म्हात्रे, आत्माराम ठाकूर, प्रतिक ठाकूर, वामन ठाकूर, अलका ठाकूर, सिंधू ठाकूर, आदिनाथ ठाकूर, सुनील ठाकूर यांच्यासह अन्यजण उपस्थित होते. सूत्रसंचालन शिल्पा म्हात्रे व महेश गावंड यांनी केले. तर निकिता म्हात्रे यांनी आभार मानले.

## रस्ता स्वच्छतेत महिलांचा सहभाग




**संगमेश्वर :** तालुक्यातील माखजन ग्रामपंचायतीने, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत महिलांच्या सहभागातून रस्त्यांची स्वच्छता व साफसफाई केली. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या अनुषंगाने माखजन ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावातील रस्त्यांची कामे तसेच रस्त्यांची व पाणंद रस्त्यांची दुरुस्ती व स्वच्छता करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. यामध्ये गावातील महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. गावातील स्वच्छता राखणे, रस्ते सुस्थितीत ठेवणे आणि दळणवळण सुलभ होण्यासाठी महिलांनी एकत्र येत श्रमदानातून रस्त्यांची साफसफाई केली. ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने व स्थानिक नागरिकांच्या सहकायनि हे कार्य अत्यंत प्रभावीपणे झाले. या उपक्रमामधून महिलांच्या सामाजिक सहभागाचे महत्व अधोरेखित झाले.

## मद्य वाहतुकप्रकरणी ८८ गुन्हे दाखल

**रत्नागिरी :** राज्य उत्पादन शुल्क विभागाने ३१ डिसेंबरच्या सेलिब्रेशनच्या पार्श्वभूमीवर डिसेंबर प्रारंभापासून दक्षता घेण्यास सुरुवात केली. या पार्श्वभूमीवर केलेल्या कारवाईत गोवा बनावटीच्या विदेशी मद्याची वाहतूक करणारी ३ वाहने पकडली. तब्बल ८८ गुन्हे दाखल करण्यात आले असून ८० आरोपींना अटक करण्यात आली. यामध्ये ४५ लाख रुपये महिन्याच्या किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नवीन वर्षाचे स्वागत किंवा सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी ३१ डिसेंबर रोजी विविध ठिकाणी सामूहिक कार्यक्रम आयोजित केले जातात. हॉटेल, परमिट रुम-बिअर बार या दिवशी गर्दीने फुललेले असतात. या पार्श्वभूमीवर स्वस्तात मिळणारी गोवा बनावटीचे मद्य आणून ते चढ्या दराने विकून नफा मिळवण्याची प्रवृती वाढीस लागते. ही वाहतूक रोखण्यासाठी दिवस रात्र गस्त सुरु आहे.

# पाणी उशिरा सोडल्याने शेतकरी नाराज

## ४० गावातील शेती येणार पाण्याखाली; दुबार शेतीसाठी पाण्याची आवश्यकता



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्याचा पूर्वभाग हिरवागार करणाऱ्या राजनाला कालव्यात पाणी सोडण्यात आले आहे. टाटा कंपनीच्या आंध्र धरणातील पाण्यावर वीजनिर्मिती केल्यानंतर राजनाला कालव्यात सोडले जाते. या पाण्यावर ४० गावातील शेतकरी दुबार शेती करीत असतात. दरम्यान राजनाला कालव्यात पाणी आल्याने शेतात पाणी वळवून जमीन ओली करण्याची घाई शेतकरी करू लागले आहेत. मात्र २० दिवस पाणी उशिरा सोडण्यात आल्याने शेतकऱ्यामध्ये नाराजी आहे.


कालव्याचीनिर्मिती कर्जत पूर्व भागातील शेती ओलिताखाली आणण्यासाठी झाली. पुढे त्या कालव्याचे पाणी शेतीसाठी दरवर्षी दिले जात असतांना वेळेवर कालाव्याची दुरुस्ती होणे गरजेचे असतांना ती न झाल्यामुळे कालवे अनेक ठिकाणी पोकळ झाले होते. शेवटी २०११ मध्ये राज्य सरकारने राजनाला कालाव्याची दुरुस्ती करण्यासाठी निधि मंजूर केला. सध्या राजनाला कालवा पूर्ण क्षमतेने भरून वाहत असल्याने सर्व भागात शेती केली जात आहे. यावर्षी सावळा गावाच्या शिवारात देखील पाणी पोहचले असल्याने भाताची शेती त्या भागात अनेक वर्षांनी बहरणार आहे.कारण राजनाला कालव्याची दुरुस्तीचे काम सुरु झाल्यापासून म्हणजे किमान १४ -१५ वर्षे या भागात कालव्याचे पाणी पोहचत नव्हते. मागील दोन वर्षांपासून पाटबंधारे विभागाचे उप अभियंता अमित पारधे यांनी नियोजनबद्ध पणे कालव्यांच्या दुरुस्तीची अर्धवट पूर्ण केली आणि त्यामुळे कालव्यातुन पाणी सर्व भागात पोहचु लागले आहे.

यावर्षी २९ डिसेंबर रोजी राजनाला कालव्याच्या झिरो बंधाऱ्यातून पाणी कालव्यात सोडले गेले असून आतापर्यंत कालव्याच्या १५ किलोमीटर हुन अधिक भागातून पाणी पुढे पुढे जात आहे. मात्र एक किलोमीटर लांबीचा झिरो बंधारा मधून जाणारे पाणी पुढे उजवा कालवा, डावा कालवा, पोटल कालवा आणि हेदवली कालव्यातून पाणी पुढे जात असते. मात्र दुबार शेती करीत असताना कमी वेळेत भाताचे पीक तयार व्हावे यासाठी ११० ते ११५ दिवसात शेतात पीक तयार होणारे रत्ना जातीच्या वाणाला सर्वाधिक पसंती शेतकरी देत असतात. हायब्रीड जातीची वाण यांचे पीक हातात येण्यासाठी किमान १२५ दिवसांचा आणि कधी त्यापेक्षा अधिक कालावधी लागतो. त्यामुळे उन्हाळी शेती करतांना वेळेचे नियोजन महत्वाचे असल्याने रत्ना जातीच्या वाणाला अधिक पसंती शेतकरी देत असतात, राजनाला मुख्य कालव्यात पाणी सोडले गेले, त्यानंतर ते पाणी शेतात पोहचले असून पोटनाल्यातून शेतकऱ्यांनी आपल्या शेतात वळवून शेते ओली करून ठेवली आहेत. काही शेतकऱ्यांनी आपल्या घरी असलेल्या पॉवर ट्रेलर किंवा ट्रॅक्टरच्या नांगराच्या माध्यमातून शेताची नांगरणी सुरु केली आहे.

### हवामान बदलामुळे शेतकरी त्रस्त

हवामान बदलामुळे यावर्षी देखील मे महिन्यात पाऊस झाला तर काय करायचे? या भीतीने शेतकरी त्रस्त आहेत. गतवर्षी राजनाला कालवा भागातील शेतकऱ्यांच्या जमिनीमध्येच भाताचे पीक भिजून गेले होते. त्यामुळे यावर्षी डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात कालव्यात पाणी सोडण्याची शेतकऱ्याने अपेक्षा होती. नवीन वर्षाच्या शेतात पाणी येऊ लागले असल्याने शेतकरी नाराज आहेत.

# शौर्य रांगोळी ठरली लक्षवेधी



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

श्री शिवदत्त मंदिर चौल, आंबेपूर येथे संपन्न झालेल्या रांगोळी प्रदर्शनामध्ये मुरुड तालुक्यातील नांदगाव सारख्या ग्रामीण भागातून आलेला रांगोळीकार क्षितिज मळेकर याने दुबई एअर शो दरम्यान तेजस अपघातात मृत्युमुखी पडलेले भारतीय वायू सेनेचे शूर वैमानिक विंग कमांडर नामांश स्याल यांना अर्पण केलेली हृदयस्पर्शी श्रद्धांजली वाहण्यासाठी साकारलेली रांगोळी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. आकाशात झेप घेणाऱ्या त्यांच्या स्वप्नांचा आणि देशासाठी दिलेल्या सर्वोच्च बलिदानाचा साक्षीदार म्हणजे ही रांगोळी असल्याचे क्षितिजने सांगितले, काही दिवसांपूर्वी रेवदंडा येथील कालभैरव मंदिरामध्ये कालभैरव जयंतीनिमित्त क्षितिजने साकारलेल्या एका स्त्रीच्या पाण्यातील प्रतिबिंबाची रांगोळी पाहून दर्शक अवाक झाले होते.

# निलेश थळी यांचे निधन

**उरण :** शेतकरी कामगार पक्ष नागावचे ज्येष्ठ नेते जिल्हा चिटणीस मंडळ सदस्य भारतराज थळी यांचे छोटे बंधू निलेश भास्कर थळी यांचे वयाच्या ५२ व्या वर्षी अल्पशा आजाराने रविवार (दि.२८) डिसेंबर रोजी निधन झाले. थळी यांच्या अंत्ययात्रेसाठी राजकीय



सामाजिक क्षेत्रातील जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्या पश्चात भाऊ, आई, मुले, असा मोठा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवार (दि. ६) जानेवारी रोजी पिर वाडी येथे तर बारावे ८ जानेवारी गुरुवारी राहत्या घरी नागाव येथे होणार आहेत.

# 'नगराध्यक्षा पद जनसेवेची संधी'



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी जात धर्म न पाहता सर्वांना सोबत घेऊन शहराचा विकास करणार तो पण पारदर्शक, लोकाभिमुख असणार आहे. सुनील तटकरे परिवार व मला शहरातील जनतेने माझ्यावर विश्वास टाकला त्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही. नगराध्याक्षा पद जनसेवा करण्याची संधी आहे असे प्रतिपादन नवनिर्वाचित नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांनी मुरूड जंजिरा नगरपरिषद कार्यालयातील सभागृहात झालेल्या पदग्रहण समारंभा प्रसंगी केले. यावेळी मंत्री अदिती तटकरे, माजी आ. अनिकेत तटकरे, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, अमित नाईक, सुरेंद्र म्हात्रे, फैरोज घलटे, मनोज भगत, मुख्याधिकारी सचिन बच्छाव, वासंती उमरोटकर, विश्वास चव्हाण, पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे, अजित कासार, रुपेश पाटील, आदेश दांडेकर, तमीम ढाकम, प्रांजली मकू, प्रीता चौलकर, प्रमिला माळी, श्रद्धा अपराध आदीसह शहरातील नागरिक व असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हंगामी भाज्यांची आवक वाढली

**पनवेल :** रायगड जिल्ह्यातील विविध भाजी मार्केटमध्ये हंगामी भाज्यांची चांगलीच आवक वाढली आहे. दरम्यान, ग्रामीण भागातून पोपटीसाठीच्या वालाच्या शेंगा मोठ्या प्रमाणात पनवेल बाजारात दाखल झाल्या आहेत. शेतकरी सकाळी लवकरच आपला ताजा भाजीपाला थेट बाजारात आणत असल्याने वालाच्या शेंगा मिळत आहेत. थंड हवामान या शेंगांच्या पिकासाठी पोषक ठरत असून यंदा उत्पादनात वाढ झाली आहे. पनवेल बाजारात वालाच्या शेंगांसोबतच घेवडा, गवार, चवळी अशा इतर हंगामी शेंगांचीही आवक वाढली आहे. बाजारात विविध प्रकारच्या शेंगा उपलब्ध झाल्याने गृहिणींमध्ये खरेदीची चांगलीच लगबग दिसून येत आहे. सध्या वालाच्या शेंगांना मागणी जास्त असून दरही स्थिर असल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली. स्थानिक उत्पादनाला चांगला भाव मिळत असल्याने शेतकरी वर्गही समाधान व्यक्त करत आहे.

# विद्यार्थी रमले फुलांच्या दुनियेत

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शहरातील माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर नारायण शिपुरकर इंग्रजी माध्यम प्राथमिक शाळेत पुष्पगुच्छ स्पर्धा पार पडली. ही स्पर्धा चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीचा, सर्जनशीलतेचा उत्सव ठरली. इयत्ता पहिली ते पाचवीतील लहान विद्यार्थ्यांनी आपल्या नाजूक व कोमल हातांनी रंगीबेरंगी कागदांपासून विविध फुलांचे अप्रतिम आविष्कार साकारत संपूर्ण शाळा फुलांच्या दुनियेत न्हाऊन निघाली. देशविदेशातील विविध फुलांची रूपे, आकर्षक रंगसंगती, नक्षीकाम आणि कल्पक सजावटीतून विद्यार्थ्यांनी मनमोहक पुष्पगुच्छ तयार केले. फुले घडवताना ही चिमुकली मुले इतकी रमून गेली होती. विद्यार्थ्यांच्या अंगी दडलेल्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा त्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि कल्पनाशक्तीला योग्य दिशा मिळावीयासाठी शिपुरकर शाळेत सातत्याने विविध कला व सर्जनशील स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून पुष्पगुच्छ स्पर्धा होण्यात आली. त्यात तब्बल ९० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. शाळेतील वर्गखोल्यांमध्ये शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली या लहानग्या कलाकारांनी स्वतःच्या कल्पनांना वेगवेगळ्या आकारात साकारले. फुलांवरील कलाकुसर, नक्षीकाम पाहताना प्रेक्षकही मंत्रमुग्ध झाले होते. या स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात गौरविण्यात येणार असून त्यांना बक्षिसे देण्यात येणार आहेत. मुख्याध्यापिका मनिषा मोरे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन करत त्यांच्या कलागुणांचे भरभरून कौतुक केले. प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला व्यापक व्यासपीठ मिळणार असून चिमुकल्या कलाकारांच्या प्रतिभेचे दर्शन घडणार आहे

# मायणी शाळेतील विद्यार्थी बनले रिपोर्टर




**। खरोशी । प्रतिनिधी ।**

आजच्या धकाधकीच्या आणि डिजिटल युगात विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकापुरते शिक्षण न देता त्यांना आपल्या परिसराशी, संस्कृतीशी व इतिहासाशी जोडण्याचा अभिनव उपक्रम पेण तालुक्यातील गागोदे केंद्रातील राजिप शाळा मायणी कोयना शाळेतील विद्यार्थी थेट रिपोर्टरच्या भूमिकेत उतले. आपल्या गावाची ओळख संपूर्ण समाजास करून देत आहेत. प्रत्येक गावाला केवळ भूगोल नसतो, तर त्याला स्वतःचा इतिहास, परंपरा, संस्कृती, वैशिष्ट्ये आणि धार्मिक अध्यात्मिक वारसा असतो, ही संकल्पना या उपक्रमामागे आहे. विद्यार्थ्यांनी गावातील ऐतिहासिक स्थळे, धार्मिक परंपरा, ग्रामदैवत, सण-उत्सव, लोककला, व्यवसायांची माहिती संकलित करून ती प्रभावीपणे सादर केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षणशक्ती, संवादकौशल्य, आत्मविश्वास व चिकित्सक विचार सभाधीटपणा संभाषण विकसित होत असून गावकऱ्यांनाही आपल्या गावाचा अभिमान वाटत आहे. विशेष म्हणजे या उपक्रमाला ग्रामस्थ, पालक व मान्यवरांकडून मोठ्या प्रमाणात पसंती मिळत आहे. मुख्याध्यापक रामकृष्ण भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या उपक्रमाला अमित महागावकर, मंगेश पाटील यांचे सहकार्य लाभले.

# रुग्णोपयोगी साहित्य केंद्र सुरु

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणारे रुग्णोपयोगी साहित्य केंद्र सुरू करण्यात आले असून, या उपक्रमामुळे अनेक कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे. सेवाभारती कोकण प्रांत ट्रस्ट यांच्या माध्यमातून पनवेल येथील डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालयात हे केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. आजच्या काळात आजारपणात रुग्णोपयोगी साहित्य खरेदी करणे अनेकांसाठी खर्चिक ठरत असते. हीच गरज ओळखून अत्यल्प दरात व भाडेतत्त्वावर हे साहित्य उपलब्ध करून देण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला आहे. सेवाकार्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या महर्षी वाल्मिकी शाखा व नंदनवन शाखेतील सेवाभावी स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. या केंद्रामार्फत एअर बेड, वॉटर बेड, ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर, व्हील चेअर, वॉकर, कमोड चेअर, नेब्युलायझर, वॉकिंग स्टिक, विविध प्रकारचे पॉट उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

व्हॉट्सअप ग्रुपवर व्हायरल झाल्याने खळबळ | प्रशिक्षणार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण

# बिबट्याची अफवा पसरविणाऱ्यांवर होणार कारवाई



**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

सध्या सोशल मीडिया आणि सर्वत्रच बिबट्या आढळून आल्याच्या वृत्ताने खळबळ निर्माण झाली आहे. असे असतांनाच नागोठणे आयटीआयच्या मागील बाजूस असलेल्या झाडी झुडपांत असलेल्या जागेत बिबट्याच्या संशयास्पद पाऊलखुणा आढळून आल्याचे आयटीआयच्या सुरक्षा रक्षकाने संशय व्यक्त केल्याने आणि संबंधित विभागाला पाठविण्यासाठी तयार केलेले तशा आशयाचे पत्र नागोठणे आयटीआयकडून संबंधित विभागाला पाठविल्याने आणि ते पत्र नागोठण्यातील व्हॉट्सअप ग्रुपवर व्हायरल झाल्याने खळबळ निर्माण झाली. मात्र हे ठसे फॉरेन्सिक टीमला कुत्र्याच्या पायाचे आढळून आल्याने नागोठणे शहर व परिसरात सर्वांनी सुटकेचा श्वास घेतला घेतला आहे. मात्र असे असतांनाच सध्या बिबट्याच्या नावाने सर्वत्र बोंब असल्याने कुणीही खात्री केल्याशिवाय सोशल मीडियावर अफवा पसरवू नये अन्यथा संबंधिताविरोधात गुन्हा दाखल करण्यात येईल असे संकेत वन खात्याचे नागोठणे वन परिक्षेत्र अधिकारी दादासाहेब कुकडे यांनी दिले आहेत.

यासंदर्भात उपलब्ध झालेल्या माहितीनुसार या संदर्भात नागोठणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून रोहा प्रांत अधिकारी, रोहा तहसीलदार, सरपंच नागोठणे ग्रामपंचायत तसेच जिल्हा वनाधिकारी व स्थानिक कार्यालय यांना (दि.२९) डिसेंबर रोजी एक पत्र पाठवून नागोठणे आयटीआय परिसरात बिबट्या आढळल्याची लेखी माहिती कळविली आहे. नागोठणे आयटीआयकडून पाठविण्यात आलेल्या या पत्रात म्हटले आहे की, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नागोठणे संस्थेच्या परिसरामध्ये व अवतीभवती बिबट्याच्या पायाचे ठसे आढळून आले असून व प्रत्यक्ष तीन ते चार दिवसांपासून बिबट्या परिसरात वावरताना दिसून आलेला आहे.

सदर संस्थेमध्ये एकूण ४०० ते ४५० प्रशिक्षणार्थी विविध व्यवसायामध्ये प्रशिक्षण घेत आहेत. सदर परिसरामध्ये बिबट्या वाघाचे दर्शन व पायाचे ठसे दिसून आल्यामुळे या संस्थेतील कर्मचारी व प्रशिक्षणार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाल्यामुळे त्याचा परिणाम प्रशिक्षणार्थ्यांवर झाल्याचे दिसून येत आहे. तरी संस्थेच्या परिसरामध्ये बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी आपल्या स्तरावर त्वरित उपाययोजना करण्यात यावी, अशी विनंती या पत्राद्वारे संबंधितांना करण्यात आली आहे.

> "प्राण्याच्या पायाचे ठसे पुणे येथील फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठवले असता हे पायाचे ठसे कुत्र्याचे असल्याचा निष्कर्ष पुणे फॉरेन्सिक लॅब व रोहा येथील फॉरेन्सिक टीमने काढला आहे."
> -दादासाहेब कुकडे

दरम्यान नागोठणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या मागील बाजूस असलेल्या झाडी झुडपांतील परिसरात आढळलेल्या असल्याची अधिकृत माहिती नागोठणे वनपरिक्षेत्र दरम्यान या प्रकरणात नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांनीही आयटीआयच्या संबंधित जागेवर जाऊन पाहणी केल्याने फॉरेन्सिक टीमच्या अहवाला नंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे स्पष्ट केले आहे.

## निवडक

### द्रुतगती महामार्गावर भीषण अपघात

**पनवेल :** पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर भीषण अपघात झाल्याची घटना घडली. अचानक रांग बदलणाऱ्या कंटेनरमुळे झालेल्या अपघातात इनोव्हा कारमधील दोघांना आपला जीव गमवावा लागला, तर अन्य प्रवासी जखमी झाले. पहाटेच्या शांत वेळेत घडलेल्या या भीषण अपघातामुळे महामार्गावरील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पूणे-मुंबई यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गवर आदई गावालगत हा अपघात झाला. मुंबईच्या दिशे-ने भरधाव वेगात जाणाऱ्या एका कंटेनरने अचानक रांग बदलली. त्याच वेळी मागून येणाऱ्या इनोव्हा कारला कंटेनरच्या बाजूला जोरदार धडक बसली. या धडकेत इनोव्हा कारचे मोठे नुकसान झाले. या अपघातात सांगली येथील रहिवासी अरुण कचरे (४५) आणि तुळसा पवार (४०) यांचा मृत्यू झाला असल्याची माहिती खांदेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शैलेश भद्रे यांनी दिली. अपघाताच्या वेळी इनोव्हा कारमध्ये एकूण सात प्रवासी होते. हे सर्व प्रवासी सांगली येथून कळंबोलीकडे प्रवास करत होते. अपघातात इनोव्हा कारमधील अन्य दोन प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली, तर तीन प्रवाशांना मुकामार लागल्याचे पोलिसांनी सांगितले. जखमींना तत्काळ उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. सुदैवाने त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजते. दरम्यान, कंटेनर चालक चंदु प्रकाश याने निष्काळजीपणे वाहन चालवत अचानक रांग बदलल्यामुळे हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. संबंधित चालकाला ताब्यात घेऊन नोटीस देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

### अंगारक संकष्ट चतुर्थीचे वेळापत्रक

**उरण :** भगवान श्री गणेशाची उपासना करणार्या भाविकांसाठी २०२६ सालातील संकष्ट चतुर्थी व अंगारक संकष्ट चतुर्थीचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. २०२६ मध्ये एकूण तीन अंगारक संकष्ट चतुर्थी येत आहेत. २०२६ मधील संकष्ट चतुर्थी (चंद्रोदय वेळेसह) ६ जानेवारी, मंगळवार - अंगारक संकष्ट चतुर्थी - रात्री ९.२२, गुरुवार दि. ५ फेब्रुवारी- संकष्ट चतुर्थी - रात्री ९.४८, शुक्रवार दि. ६ मार्च- संकष्ट चतुर्थी - रात्री ९.१९, रविवार दि. ५ एप्रिल - संकष्ट चतुर्थी - रात्री ९.४७, मंगळवार दि. ५ मे - अंगारक संकष्ट चतुर्थी - रात्री १०.१९, बुधवार दि. ३ जून - संकष्ट चतुर्थी - रात्री ९.५२, शुक्रवार दि. ३ जुलै - संकष्ट चतुर्थी - रात्री ९.५२, रविवार दि. २ ऑगस्ट - संकष्ट चतुर्थी - रात्री ९.३७, मंगळवार दि. २९ सप्टेंबर - अंगारक संकष्ट चतुर्थी - रात्री ८.१४, गुरुवार दि. २९ ऑक्टोबर- संकष्ट चतुर्थी - रात्री ८.५३, शुक्रवार दि. २७ नोव्हेंबर- संकष्ट चतुर्थी - रात्री ८.५१, शनिवार दि.२६ डिसेंबर- संकष्ट चतुर्थी - रात्री ८.४५ आहे.

### बुरखाधारी महिलांनी चोरल्या बांगड्या

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील महात्मा गांधी रोडवरील राजेंद्र कांतीलाल बांठिया ज्वेलर्स या सराफ दुकानात बुरखा परिधान करून आलेल्या दोन महिलांनी हातचलाखीने सोन्याची बांगडी लांबवल्याची घटना घडली. चोरट्यांनी मोराच्या डिझाइनची सुमारे २५ ग्रॅम वजनाची सोन्याची एक बांगडी चोरून नेल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी दुकानाचे मालक गिरीश राजेंद्र बांठिया यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, त्यानुसार अज्ञात महिलांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक हजरत पठाण अधिक तपास करीत आहेत.




### बॅरिकेट वाहतूक शाखेला सुपूर्द

**पनवेल :** पनवेल येथील लाईफ लाईन हॉस्पिटल यांनी पनवेल वाहतूक शाखेला बंदोबस्तसाठी २० लोखंडी बॅरिकेट मदत केली आहे. ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर तत्कालीन पोलीस निरीक्षक संजय शांताराम पाटील, यांच्या समन्वयातून पनवेल शहर वाहतूक शाखेसाठी लाईफ लाईन हॉस्पिटलचे डॉक्टर प्रकाश पाटील आणि जयश्री पाटील यांच्यावतीने पनवेल वाहतूक शाखेला २० २० लोखंडी बॅरिकेट देण्यात आले. यावेळी पनवेल वाहतूक शाखेचे वपोनि औदुंबर पाटील व इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. प्रकाश पाटील तसेच पो. नि. संजय शां. पाटील गुन्हे यांचे शाल श्रीफळ देऊन व हॉस्पिटल स्टाफचे वपोनि औदुंबर पाटील यांनी मानले.

### पर्यावरणीय साक्षरता कार्यक्रम

**नवीन पनवेल :** तालुका विधी सेवा समिती पनवेल, वकील संघटना पनवेल आणि पंचायत समिती पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आजचे रक्षण करा, उद्या सुरक्षित करा या विषयावर आधारित पर्यावरणीय कायदेशीर साक्षरता व समुदाय संरक्षण उपक्रम अंतर्गत जनजागृती कार्यक्रम पळस्पे येथे यशस्वीपणे संपन्न झाला. हा कार्यक्रम पळस्पे ग्रामपंचायत कार्यालयात पार पडला. यावेळी ११० नागरिकांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रदूषणग्रस्त भागांतील असुरक्षित समुदायांमध्ये पर्यावरणीय कायद्यांविषयी साक्षरता वाढवणे, उच्च प्रदूषण पातळीमुळे निर्माण होणाऱ्या आरोग्यधोक्यांबाबत जनजागृती करणे, प्रदूषणाच्या संपर्कासंदर्भातील गैरसमज दूर करणे तसेच पर्यावरणीय कायद्यांतर्गत उपलब्ध तक्रार निवारण यंत्रणांपर्यंत नागरिकांना पोहोचण्यास मदत करणे, यावर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास गटविकास अधिकारी समीर वाठारकर, ॲड. दिपाली बोहरा, शैलेश कोंडसकर ॲड. सुयश कामेरकर, ॲड. अंकुश कुळये हेमंत आंबेतकर हे उपस्थित होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- कामासाठी माणसे पाहिजेत - अलिबाग परिसरातील गरजुंनी वयोगट २८ ते ४० १) एस.टी. ने डिलेवरी २) मोटारसायकल डिलेवरी लायसन्स गरजेचे ३) पार्ट किंवा फूल टाईम ४) मोबाईल सेल्समन (बुकींगसाठी) मो.८८८८२२०२२१
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६ अलिबाग

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# साहस संस्कार शिबीर २०२५

**नवीन पनवेल :** रायगड जिल्हा वैश्यसमाज महिला संघाच्यावतीने साहस संस्कार शिबीर २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. हा उपक्रम अत्यंत उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडला. या शिबिराचे आयोजन शामल आंग्रे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले असून सांस्कृतीक कमिटी अध्यक्षा मीरा आंग्रे यांच्या पुढाकारातून या उपक्रमास विशेष चालना मिळाली. या शिबिरासाठी हर्षला तांबोळी, अर्चना झिंज, प्रगती दलाल, रसिका महाजन तसेच सर्व महिला कमिटी सदस्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक योगदान दिले. जवळपास ६० मुलांसाठी दोन दिवसांचे साहस संस्कार शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात मुलांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी बक्षीस वितरण कार्यक्रम देखील पार पडला.

# माता पिताचे छत्र हरपलेला तरुण बनला पोलीस ...

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील भूतीवली गावातील अगदी लहान वयात आई-वडीलांचे छत्र हरवलेला संदीप कोंडे या तरुणाने जिद्दीच्या जोरावर पोलीस सेवेत भरती होण्यात यश मिळविले आहे. नुकताच अलिबाग येथे जिल्हा क्रीडा संचालकांच्या हस्ते त्याचा सन्मान करण्यात आला.

अगदी गरीब परिस्थितीत हलाखीचे जीवन जगत आणि प्रतिकृत परिस्थीवर मात करीत संदीप याने प्रसंगी चालत जात शिक्षण घेण्याचे काम केले. डोंगर कपारीमध्ये दररोज ये-जा असलेल्या संदीप कोंडे याने आपल्या मोठ्या भावाच्या पाठिंब्याने पोलीस भरतीसाठी प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. त्यानंतर एका अकॅडमीमध्ये प्रशिक्षण घेऊन पोलीस भरतीचा अडथळा यशस्वीपणे पार केला. त्याचवेळी संदीप स्थानिक तरुणांना प्रशिक्षण देण्यासाठी देखील आघाडीवर असून अनेक तरुणांना प्रशिक्षण देत आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, आमचे आशील यांनी खालील जमिन मिळकती या त्या मिळकतीचे मालक श्री संदेश जयवंत म्हात्रे, सौ राजेश्री संदेश म्हात्रे व विशाल जयवंत म्हात्रे यांचे कडुन कायमस्वरूपी खरेदी करिता किंवा संयुक्तपणे विकसित करणे करिता घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन :**

**मौजे.उसाळे, ता. सुधागड, जि. रायगड.**

| अ. क्र | सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे.आर | आकार रूपये पैसे | अ. क्र | सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे आर | आकार रूपये पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६/४ | ०-३८-० | ०-१२ | ८ | ७/४ | ०-२०-० | ०-१२ |
| २ | ६/५ | ०-३६-० | ०-१२ | ९ | ८/१/अ | १-३७-० | ०-४७ |
| ३ | ६/७ | ०-५६-० | ०-१२ | १० | ८/२/ब | १-३६-० | ०-४७ |
| ४ | ६/८ | ०-२७-० | ०-१२ | ११ | ८/३ | ५-६८-० | १-७५ |
| ५ | ६/१० | १-४५-० | ०-९५ | १२ | ८/२ | २-२३-० | ०-८१ |
| ६ | ७/१ | ०-७६-० | ०-१२ | १३ | ६/९ | ०-७४-० | ०-२५ |
| ७ | ७/२ | २-०३-० | ०-३९ | | | | |

सबब, वर नमुद केलेल्या मिळकती बाबत अन्य कोणाही इसमांचा, संस्थांचा, साठेकरार, कुळवहिवाट, बक्षीसपत्र, खरेदीखत, ट्रस्ट, वारसा, पोटगी, चार्ज, संपादन, मृत्युपत्र, गहाण, ताबा, भाडेपट्टा, या अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी पुराव्यासह आपल्या हरकती खालील पत्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन (१०) दहा दिवसांच्या आत सादर कराव्यात.

सदर मुदतीत अश्या प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास कुणाचाही, कसलाही प्रकारचा हबक हितसंबंध नाही अथवा तो आमच्या आशिलांच्या लाभांत सोडुन दिलेला आहे. असे समजुन आमचे आशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची याद्वारे नोंद घ्यावी.

खालापुर
दि. ३१.१२.२०२५

**ॲड. नितीन पांडुरंग गायकवाड**
ऑफीस हरीओम बिल्डींग, दुसरा मजला,
फ्लॅट नं.४, खालापुर, ता.खालापुर, जि.रायगड.
मो.९०२८४४४८४४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळवण्यात येते की, खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत हि खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असुन ती त्यांचे खुद्द ताबा, कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे. त्या शेत जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे वृंदावन, ता. तळा, जि. रायगड, येथील मिळकत**

| मालकाचे नाव | गट नं | एकुण क्षेत्र हेआर | आकार रु. पै | प्रकार |
|---|---|---|---|---|
| विशाल विकास लाड | ६५/११ | वरकस २-६८-००<br>पो.ख. ०-६७-००<br>३-३५-००<br>पैकी विशाल विकास लाड यांच्या हिश्याचे क्षेत्र<br>१-७५-०० हे आर | १=८९<br><br><br><br>१=०१ | खालसा |

वरील मिळकती संबंधात आमचे आशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहान, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन, चार्ज, ॲटचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कबजा वहिवाट वचनचिठ्ठी दावा दरखास्त वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत हि निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

दि. ०१/०१/२०२६ सही/-

**ॲड. श्री. पी. जी. दाभाडे,**
रा. फ्लॅट नं. ४०२, बी विंग, ४ था मजला.
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजीनगर,
डॉ. वागळे हॉस्पिटल जवळ रोहा,
ता. रोहा जि. रायगड ४०२१०९,
मोबा.क्र. ९२७२७९३९५६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळवण्यात येते की, खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत हि खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असुन ती त्यांचे खुद्द ताबा, कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे. त्या शेत जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे मालुक, ता. तळा, जि. रायगड, येथील मिळकत**

| मालकाचे नाव | गट नं | एकुण क्षेत्र हेआर | आकार रु. पै | प्रकार |
|---|---|---|---|---|
| विरेश हनुमंत येवले | ११०/७ | वरकस ०-५४-००<br>पो.ख. ०-३८-००<br>०-९२-००<br>पैकी विरेश हनुमंत येवले यांच्या हिश्याचे क्षेत्र<br>०-७२-०० हे आर | ०=१९<br><br><br><br>०=१५ | खालसा |
| विरेश हनुमंत येवले | ११७/४/ब | वरकस ०-३१-०० | ०=१४ | खालसा |

वरील मिळकती संबंधात आमचे आशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहान, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन, चार्ज, ॲटचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कबजा वहिवाट वचनचिठ्ठी दावा दरखास्त वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत हि निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

दि. ०१/०१/२०२६ सही/-

**ॲड. श्री. पी. जी. दाभाडे,**
रा. फ्लॅट नं. ४०२, बी विंग, ४ था मजला.
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजीनगर,
डॉ. वागळे हॉस्पिटल जवळ रोहा,
ता. रोहा जि. रायगड ४०२१०९,
मोबा.क्र. ९२७२७९३९५६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :**

**मौजे - किकवी, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकतः -**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.-चौ मी | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| गणेशा एस के एस राव | १२७ | २/ब | १-३६-०० | १ | ३० |
| | १२७ | २/क | ०-४६-०० | ० | ४१ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- ०१/०१/२०२६
मो. नं. ९०२८९८२२७७
ई मेलः adv.jayeshmhase@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळवण्यात येते की, खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत हि खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असुन ती त्यांचे खुद्द ताबा, कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे. त्या शेत जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे शेनाटे, ता. तळा, जि. रायगड, येथील मिळकत**

| मालकाचे नाव | गट नं | एकुण क्षेत्र हेआर | आकार रु. पै | प्रकार |
|---|---|---|---|---|
| राखी राकेश वडके | १९४ | वरकस ०-६८-००<br>पो.ख. ०-६८-००<br>१-३६-०० | ०=२५ | खालसा |
| राखी राकेश वडके | १९५ | वरकस ०-५६-००<br>पो.ख. ०-५६-००<br>१-१२-००<br>पैकी राखी राकेश वडके यांचे हिश्याचे क्षेत्र<br>०-३२-०० हे आर | ०=२५<br><br><br><br>०=०७ | खालसा |

वरील मिळकती संबंधात आमचे आशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहान, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन, चार्ज, ॲटचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कबजा वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत हि निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

दि. ०१/०१/२०२६ सही/-

**ॲड. श्री. पी. जी. दाभाडे,**
रा. फ्लॅट नं. ४०२, बी विंग, ४ था मजला.
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजीनगर,
डॉ. वागळे हॉस्पिटल जवळ रोहा,
ता. रोहा जि. रायगड ४०२१०९,
मोबा.क्र. ९२७२७९३९५६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसिने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विदयमान मालक श्री. निलेश वसंत म्हात्रे व सौ. नलिनी अनिलराव देशमुख असून त्यांनी सदर मिळकतीचे इतर संयुक्त मालक श्री. केदार दिनकर घरत, सौ. दर्शना दिनकर घरत आणि श्री. जयदीप दिनकर घरत यांच्या संमतीच्या हमीने माझ्या अशिलांना विक्री करण्याबाबत बोलणी केली आहेत. सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध व निजोखमी असून या मिळकतीचे पणनयोग्य हक्क त्यांना प्राप्त आहेत अशी हमी व ग्वाही त्यांनी माझ्या अशिलांना दिली आहे, तरी सदर मिळकतीवर अन्य कोणाचे गहाण, दान, दस्त, ताबा, बँक, बोजा, लेखी व तोंडी करार, अटेचमेंट, लीज, लीन, विसारपावती, साठेखत, खरेदीखत, कुळहक्क, दावा अगर अन्य कसलेही हितसंबध असल्यास त्यांनी हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसाच्या आत मूळ कागदपत्रानिशी माझी खात्री पटवून द्यावी, मात्र या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदरील मिळकत हि निर्वेध व निजोखमी आहे किवा संबंधितानी त्यांचा सदर मिळकतीवर असलेला हक्क, हितसंबंध व अधिकार जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरून माझे अशील त्यांच्या बरोबर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**परिशिष्ट :** मा. दुय्यम निबंधक साहेब तसेच तालुका पंचायत समिती तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, अलिबाग यांच्या कार्यक्षेत्रातील व जिल्हा परिषद रायगड अलिबाग आणि ग्राम पंचायत नागाव यांच्या हद्दीतील गाव मौजे नागाव येथील गट नं. १९०७/१९०८/१९१६/२/१ (मंजूर लेआऊट मधील बिनशेती भूखंड क्र. १) यासी क्षेत्र ०० हे. ०९.१९० आर यासी आकार रु. ९१.९० पैसे, हे संपूर्ण क्षेत्र श्री. निलेश वसंत म्हात्रे, सौ. नलिनी अनिलराव देशमुख, श्री. केदार दिनकर घरत, सौ. दर्शना दिनकर घरत व श्री. जयदीप दिनकर घरत यांच्या संयुक्त मालकीचे असून त्यापैकी श्री. निलेश वसंत म्हात्रे व सौ. नलिनी अनिलराव देशमुख यांचा २/३ अविभक्त हिस्सा म्हणजेच क्षेत्र ०० हे. ०६.१२६६ आर हि मिळकत. सदर बिनशेती भूखंड क्र. १ ची चतुः सिमा येणे प्रमाणे; पूर्वेस गट नं. १९०७/१९०८/१९१६/४ ची मिळकत, दक्षिणेसः गट नं. १९०७/१९०८/१९१६/२/३ खुले क्षेत्र, पश्चिमेस गट नं. १९०९ ची मिळकत व अंतर्गत रस्ता, उत्तरेसः १९०७/१९०८/१९१६/३ ची मिळकत येणे प्रमाणे चतुःसीमा पूर्वक मिळकती त्यातील सर्व तद्भूत वस्तुसहित व रस्त्याचे वहिवाटीचे हक्कासह दरोबस्त मिळकती.

पुणे. दिः ३०/१२/२०२५

**अमरीश अनंत केदारी, वकील,**
**जे.एच.जे लीगल**, ३०१/३०२, तिसरा मजला, अथर्व जयतु, सी.स.नं. ३८३/८, टिंबर मर्चेंट कॉलोनी, घोरपडी पेठ, पुणे-४११०४२, फोन :(०२०)-२६४४९४९९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे सावळे, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ मी | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| श्री.भरत तुकाराम दळवी | ३६ | १४ | ०-३०-०० | ०-४१ | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता:-ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- ०१/०१/२०२६
मो. नं. ९०२८९८२२७७
ई मेलः adv.jayeshmhase@gmail.com

सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **वाटपपत्र / करारनामा** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हि.क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता (चौ.मी.) | करारनामा/वाटपपत्र करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा /वाटपपत्र संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **नोड – द्रोणागिरी** | | | | |
| १ | २२२९ | जासई, ११/९०/११ | १०३/१०<br>एकूण क्षेत्र | १-०४-०<br>१-०४-० | ९०० चौ.मी. | द्रोणागिरी भुखंड क्र. १३१, सेक्टर-५६, क्षेत्र-९०० चौ.मी. | **१) जनार्दन चाया ऊर्फ चाहू ठाकूर मयत असून त्यांचे वारस**<br>१:१) दत्तात्रेय जनार्दन ठाकूर (मयत), १:२) केसरीनाथ जनार्दन ठाकूर १:३) गोपिनाथ जनार्दन ठाकूर १:४) श्रीराम जनार्दन ठाकूर १:५) राधाबाई शंकर पाटील १:६) ललिता काशिनाथ मढवी १:७) संध्या चंद्रकांत ठाकूर १:८) सुरेखा सुर्यकांत भोईर<br>**२) तुळसाबाई चाया ठाकूर ह्या मयत असून त्यांचे वारस**<br>२:१) चांगुणाबाई बबन पाटील (मयत)<br>**३) चांगुणाबाई बबन पाटील ह्या मयत असून त्यांचे वारस**<br>३:१) दत्ता बबन पाटील ३:२) निर्मला काशिनाथ पाटील<br>३:३) **अनुसया प्रभाकर पाटील ह्या मयत असून त्यांचे वारस**<br>३:३:१) केतन प्रभाकर पाटील<br>३:३:२) पुजा प्रशांत कडू पुर्वाश्रमीची पुजा प्रभाकर पाटील ३:४) यशोदा ऊर्फ निर्मला धर्मा पाटील<br>३:५) **रोहीदास बबन पाटील हे मयत असून त्यांचे वारस**<br>३:५:१) रजनी रोहीदास पाटील<br>३:५:२) सुगंधा गणेश पाटील<br>३:५:३) सुनिता अशोक घरत<br>३:५:४) सविता सचिन ठाकूर<br>३:५:५) सुभद्रा रोहीदास पाटील<br>३:५:६) राजेश रोहीदास पाटील ३:५:७) अश्विनी रोहीदास पाटील ३:५:८) सिध्देश रोहीदास पाटील<br>**४) दत्तात्रेय जनार्दन ठाकूर हे मयत असून त्यांचे वारस**<br>४:१) संध्या दत्तात्रेय ठाकूर<br>४:२) रोहीत दत्तात्रेय ठाकूर ४:३) संदेश दत्तात्रेय ठाकूर | निरंक |
| | | | | **ता.पनवेल, जि.रायगड** | | | | |
| २ | उलवे २०१८ | न्हावे २/९४ | अ/४२६<br>अ/७६८<br>अ/९२२<br>अ/९३६<br>अ/१०१४ | ०-३१-०<br>०-३६-९<br>०-४५-०<br>०-५१-०<br>०-५८-० | १९५० चौ.मी. | उलवे नोड येथील भुखंड क्र. ७A, सेक्टर-१८, क्षेत्र-१९४९.७१ चौ.मी. | **कै. भिमाबाई माणिक ठाकूर (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. भाऊ माणिक ठाकूर,<br>२) श्री. अनंत माणिक ठाकूर<br>३) श्रीमती सिताबाई उर्फ सिमाबाई चंद्रकांत मोकल | -- |
| ३ | करंजाडे ११६ | **करंजाडे ११२/११४**<br>**वडघर ४२** | **११७/०**<br>**४/३** | **०-५७-०**<br>**०-३०-१** | ७५० चौ.मी. पैकी १७५ चौ.मी. अ. बांध-कामापोटी राखीव ५७५ चौ.मी. | **नोड – करंजाडे भूखंड क्र. ७१C, सेक्टर-०३, क्षेत्र-५७४.९० चौ.मी.** | मुळ भूधारक.-<br>कै. तुकाराम जोमा म्हात्रे (मयत) यांचे वारस<br>१) श्रीमती. भागीरथी तुकाराम म्हात्रे<br>२) श्रीमती. हिराबाई नारायण म्हात्रे<br>CMA No.१९३/१९९५<br>दि. चौकशी अर्ज क्र. १९३/१९९५<br>कै. श्रीमती. भागीरथी तुकाराम म्हात्रे (मयत) (दि.१०.०१.१९९६) यांचे वारस श्रीमती. हिराबाई नारायण म्हात्रे<br>CMA No. ४९/१९९७<br>कै. हिराबाई नारायण म्हात्रे (मयत) (दि.०१.०९.२०२४) यांचे वारस<br>१) श्री. बळीराम नारायण म्हात्रे<br>२) श्री. कृष्णा नारायण म्हात्रे<br>३) श्रीमती. सुरेखा अनिल चव्हाण<br>CMA No. २३०/२०२५<br>दि. चौकशी अर्ज क्र. २३०/२०२५ | निरंक |
| | | | | ०-८७-१ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :–** मुख्य भूमी व भूमापन अधिकारी,
सिडको भवन, तळ मजला,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/४५९/२०२५-२६

Office of the Public Trust Registration
Raigad Division, Alibag
"Kalpataru" Building,
near Main Post Office,
Tal. Alibag, Dist. Raigad
Date: 15/12/2025

**Public Notice for Objections**

Application No.: 247/2025
Name of Public Trust: "Nair Service Society(NSS)Kalamboli"
Trust Registration No.: F-12568/2025 (Raigad)
Applicant: Mr. VENUGOPAL K.P NAIR

All concerned persons are hereby informed through this public notice that an application has been submitted to the Assistant Charity Commissioner, Raigad Division, Alibag, under Section 22 of the Mumbai Public Trusts Act, 1950.

Any person having objections to the entries mentioned below should submit their objections in writing within the prescribed period.

Details of Immovable Properties (Land Properties) to be Recorded

1) Immovable Property (Description) - Land situated at Village Kalamboli, Navi Mumbai, Tal.Panvel,Dist.Raigad

| SR NO | VILLAGE | SURVAU NO. OR C.S.T NO, OR MUNICIPLE NO | AREA |
|---|---|---|---|
| 1 | KALMBOLI | PLOT NO.20, SEC 1/E SHOP NO 4(Ground flor) NEW GHARKUL CO-OP HOSING SOCIETY Ltd KALAMBOLI | Admeasuring 156 Sq.Ft.Carpet Area/198 Sq.Ft (built Up Area |

Main Assessment Value:-1364544 (Rs)

Boundaries:
On The East Side By : 11 MTRS WIDE ROAD
On The West Side By : OPEN SPACE
On The South Side By : PLOT NO.19
On The North Side By : PLOT NO.19

Public Notice (Objection Notice):

Any person having any objection regarding the above-mentioned property should submit their written objection with supporting documents to this office within 30 days from the date of publication of this notice.

If no objection is received within the stipulated period, it shall be presumed that no one has any objection, and further action will be taken accordingly. No objections raised after the prescribed period will be considered, and appropriate orders will be passed.

This notice is issued under my signature and seal by the Assistant Charity Commissioner, Raigad Division, Raigad, on 16/12/2025.

Sd/-
**SUPERTENDENT**
**Public Trust Registration, Office**
**Raigad Division, Raigad**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

\- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागि नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




# उदय नव्या संकल्पाचा..



● (छायाचित्र : समीर मालोदे)

| रायगड | प्रमोद जाधव |

## तात्काळ सेवा देण्यावर भर – धनराज बिक्कड

रायगड जिल्ह्यातील ग्राहकांना तात्काळ सेवा देण्यावर भर असणार आहे. तक्रारींचे निवारण जलद गतीने व्हावे, यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. नवीन कनेक्शनसाठी लागणारी धावपळ कमी करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल कनेक्शन सुरू केले जाणार आहे. या पोर्टलद्वारे ग्राहकांना घरबसल्या नवीन कनेक्शन घेता येणार आहे. पावसाळयात ग्राहकांना चांगली सेवा मिळावी म्हणून यावर्षी मान्सूनपूर्व कामे फेब्रुवारी, मार्चपासून सुरू केली जाणार आहे. २०२४मध्ये ३६ हजार ९०० कनेक्शन देण्यात आले होते. २०२५ मध्ये २७ हजार कनेक्शन दिले आहेत. २०२६ मध्ये हा आकडा ४० हजारच्या वर पोहचविण्याचा मानस आहे, अशी माहिती महावितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड यांनी दिली.




## चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध करणार : डॉ. शितल जोशी

जिल्ह्यातील महाडमध्ये दोनशे बेडचे हॉस्पीटल, उरणमध्ये शंभर बेडचे रुग्णालय, अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालय, नवीन बांधकाम करण्याचा मानस आहे. पाली- सुधागडमध्ये सध्या नवीन रुग्णालयाचे बांधकाम सुरु आहे. नव्या वर्षात हे बांधकाम पुर्ण करून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हस्तांतरीत करण्याचा प्रयत्न राहणार आहे. मुरूड, कर्जत डायलेसिस सेंटर उभारण्याचा प्रयत्न आहे. खालापूरमध्येदेखील नवीन रुग्णालय बांधले जाणार आहे. जिल्ह्यात उपचारासाठी येणाऱ्या सर्व रुग्णांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध केल्या जाणार असल्याची माहिती अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शितल जोशी यांनी दिली.

## बालविवाह रोखण्यावर भर देणार : श्रीकांत हावळे

जिल्ह्यातील बालविवाह रोखण्यावर भर देण्यात येणार आहे. परिस्थितीनुसार माहिती घेऊन योग्य ती अंमलबजबावणी केली जाणार आहे. बालविवाह होणार नाही, याकडे लक्ष दिले जाणार आहे. शासनाचे महिला धोरण झाले आहे. या धोरणानुसार, महिला सक्षमीकरण करण्यावर लक्ष दिले जाणार आहे. शासनाच्या वेगवेगळ्या योजना महिलांपर्यंत पोहचवून त्यांना भविष्याच्या दृष्टीने सक्षम करण्यात येणार आहे. महिलांसाठी असलेल्या योजना तळागळापर्यंत पोहचविण्यात येणार आहे. बालविवाह होऊ नये, याकडे लक्ष दिले जाणार आहे. बालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने देखील पावले उचलली जाणार आहेत. बालकांचे अधिकार, बाल विवाह सारखे प्रश्नांची सोडवणूक करण्यावर फोकस असणार आहे. बालकामगार सारखे गुन्हे रोखणे, पुनर्वसन करणे याबाबतही लक्ष दिले जाणार असल्याची माहिती महिला व बालविकास अधिकारी श्रीकांत हावळे यांनी दिली.

## अपघातमुक्त जिल्हा, आणि सुरक्षित वाहतूकीवर भर : अभिजीत भुजबळ

जिल्ह्यातील ब्लॅक स्पॉट अर्थात अपघात प्रवण क्षेत्राची नव्याने पाहणी करून त्याठिकाणी तात्काळ सुधारणा करणे. शाळा, कॉलेज व बाजारपेठ परिसरात विशेष बंदोबस्त तैनात करणे. डेटा अधारित वाहतूक नियोजन करण्याचा मानस आहे. अपघात, कोंडी, नियमभंग यांचा मासिक डेटा विश्‍लेषण अहवाल तयार करणे. जास्त अपघात होणाऱ्या वेळा व ठिकाणानुसार, बंदोबस्त, पोलीस कर्मचाऱ्यांसाठी नियमीत रिफ्रेशर प्रशिक्षण घेणे.
फलक, झेब्रा क्रॉसिंग, सिग्नल, स्पीडब्रेकर यांची तपासणी करणे. अतिक्रमण मुक्त रस्ते यावर प्राधान्य दिले जाईल. शाळा, महाविद्यालयात वाहतूक नियम प्रबोधन करणे. स्थानिकांसह सोशल मिडीयाचा आधार घेऊन वाहतूक सेवा सुरळीत होण्यावर भर दिला जाणार आहे. कायद्याची अंमलबजावणी, नागरिकांचा विश्‍वास, सुरक्षित प्रवास यावर अधिक भर देऊन अपघात मुक्त जिल्हा करण्याचा संकल्प असल्याचे पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांनी सांगितले.

## चकाचक रस्त्यांचा प्रयत्न राहणार : विनायक तेलंग

जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येणाऱ्या गावांतील रस्त्यांची लांबी पाच हजार ५०० किलो मीटर आहे. अतिवृष्टीमुळे खराब झालेल्या रस्त्यांची प्राधान्याने दुरुस्ती व नुतनीकरण करून गावांचा विकास साधला जाईल. रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्ते चकाचक करण्याचा मानस आहे. जिल्ह्यातील साकव व लहान पुलांची दुरुस्ती करण्याबरोबरच नव्याने बांधकाम करण्याचा प्रयत्न राहणार आहे. आपत्कालीन रस्ते, साकव यांची नव्याने बांधणी करण्याचा संकल्प आहे. योग्य पध्दतीने पाहणी करून रस्ते व साकव सुसज्ज राहतील याकडे लक्ष दिले जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषद कार्यकारी अभियंता विनायक तेलंग यांनी दिली.

## गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर : महारुद्र नाले

जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास उंचावण्यासाठी शिक्षण विभागाकडून प्रयत्न केला जाणार आहे. जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियान राबवण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांचे आधारकार्ड शंभर टक्के करण्याचा मानस आहे. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी वेगवेगळे उपक्रम घेतले जाणार आहेत. जिल्ह्यातील शिक्षक व विद्यार्थ्यांची ऑनलाईन उपस्थिती नोंदविण्यात येणार असून गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर दिला जाणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी महारुद्र नाले यांनी दिली.

## शहराच्या सर्वांगिण विकासावर भर : अक्षया नाईक

अलिबाग हे पर्यटन व ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाचे शहर आहे. लाखो पर्यटक अलिबागला भेटी देतात. शहरातील पर्यटन वाढीवर भर देण्याबरोबर शहरातील पाणी पुरवठा, रस्ते, व भूमीगत गटार योजना प्राधान्याने पुर्ण करण्याकडे लक्ष दिले जाणार आहे. अलिबाग शहराचा सर्वांगिण विकास करण्यावर भर दिला जाणार आहे. शहरातील नागरिकांना सोयी सुविधा अधिक चांगल्या देण्याचा मानस आहे, अशी माहिती अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक यांनी दिली.

## काशीदमधील रो-रो जेट्टीचे काम होणार पुर्ण

मुरूड तालुक्यातील काशीद पर्यटनाच्या दृष्टीने कायमच महत्वाचे ठिकाण मानले जाते. लाखो पर्यटक या ठिकाणी फिरण्यास येतात. मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर, ठाणे, सोलापूर, नागपूर, अशा अनेक जिल्हयातील पर्यटक काशीद समुद्रकिनारी फिरण्यास येतात. सागरमाला योजनेअंतर्गत काशीद समुद्रकिनाऱ्यापासून काही अंतरावर टर्मिनल इमारत, ब्रेक वॉटर, तरंगती जेटी उभारली जाणार आहे. पर्यटकांच्या तसेच मुंबईमध्ये नोकरीनिमित्त असलेल्या चाकरमान्यांना लवकरच मुंबईपर्यंत दीड तासात पोहचण्याची संधी रो-रो च्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे. या प्रकल्पाचे काम या वर्षात पुर्ण होणार असा विश्‍वास महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड विभागाकडून व्यक्त करण्यात आला आहे.

## नागरी सुरक्षेसह सागरी सुरक्षेवर भर : आंचल दलाल

रायगड पोलीस दलातील प्रशासकीय कामकाज अधिक पारदर्शक करण्याचा प्रयत्न राहणार आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी प्रयत्न केले जातील. पोलीस आणि नागरिकांमधील विश्‍वासाचे नाते अधिक दृढ करून जिल्ह्यातील अवैध धंदे, गैरप्रकार रोखण्याचा प्रयत्न केला जाईल. रायगड जिल्ह्यातील सागरी सुरक्षेवरदेखील भर दिला जाणार आहे.महिला, ज्येष्ठ नागरिक, बालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पावले उचलून शांततामय जिल्हा करण्याचा प्रयत्न राहणार आहे, अशी माहिती पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी दिली.

## प्रदुषण मुक्त मुरूडवर भर देणार : आराधना दांडेकर

मुरूड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी जात धर्म न पाहता सर्वांना सोबत घेऊन पारदर्शक व लोकाभिमुख असा शहराचा विकास करणार आहे. सुनील तटकरे परिवार व शहरातील जनतेने माझ्यावर टाकलेल्या विश्‍वासावर मी कधीही तडा जाऊ देणार नाही. नगराध्याक्षपद हे जनसेवा करण्याची संधी आहे. तसेच, प्रदुषण मुक्त मुरूड यावर जास्त भर असणार आहे. त्यासाठी प्लास्टिक पिशवी बंदी करणार आहोत. त्याचबरोबर शहरातील तरुणांचा रोजगार सोडविण्यास प्रयत्न करणार आहोत.

## नागरिकांचा सहभाग घेणार : वनश्री शेडगे

आम्ही कितीही योजना आणि पॉलिसी आणल्या, नवीन नियम बनवले तरी येथील नागरिकांच्या पाठिंब्या शिवाय कुठलीही योजना आम्ही यशस्वी करू शकत नाही. तसेच, शहरात छोट्या-मोठ्या समस्या आहेत, त्यात कचरा व्यवस्थापन ही मोठी समस्या आहे. त्यामुळे येथील नागरिकांना आवाहन करते की, सार्वजनिक ठिकाणी किंवा इतरत्र उघड्यावर कचरा टाकू नका. या गोष्टी नागरिकांनी अंमलात आणणे गरजेचे आहे. तसेच, आम्ही नागरिकांना आवाहन करू त्याला नागरिकांनी कृतीतून पाठिंबा दर्शवा. नागरिकांचा सहभाग आमच्या प्रत्येक निर्णयात असेल असे गृहीत धरते. सर्व मिळून आपल्या स्वप्नातील रोहा नक्कीच बनवू.

## महिलांच्या सक्षमीकरणावर भर देणार : निर्मला कुचिक

जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणासह बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी महिला व बालविकास विभागामार्फत वेगवेगळे उपक्रम राबविले जाणार आहे. महिलांच्या सुरक्षेसह बालकांचे आरोग्य चांगले राहवे यावर भर दिला जाणार आहे. शासनाच्या वेगवेगळ्या योजना राबवून तळागाळातील घटकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला जाईल अशी माहिती रायगड जिल्हा परिषद महिला व बालविकास विभागाच्या जिल्हा कार्यक्रम अधिकारी निर्मला कुचिक यांनी दिली.

## महिला दिशा देण्याचे काम करतील : ॲड. मानसी म्हात्रे

२०२५ मध्ये महिला सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आलेला होता. महाराष्ट्रामध्ये विशेषतः पुणे, मुंबई आणि नागपूर तसेच नवी मुंबई परिसरात महिलांवरील झालेले गुन्हे हे मनाला खिन्न करणारे होते. २०२६ या वर्षाचे स्वागत करताना महिलांना सुरक्षितता प्राप्त व्हावी याकरता सर्वांनी विशेष प्रयत्न करावे लागतील.२०२५ च्या सरत्या वर्षात आणि २०२६ च्या सुरुवातीला होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला अधिक सक्षमपणे सामाजिक आणि राजकीय प्रवाहामध्ये सामील होऊन स्त्री सक्षमी करण्यात वर काम करतील अशी अपेक्षा आहे असे मत शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड . मानसी म्हात्रे यांनी व्यक्त केले.

## सर्वांगिण विकासावर भर देणार : सह आयुक्त, प्रमोद जाधव

शासनाच्या वेगवेगळ्या योजना राबवून मागास वर्गीय घटकांच्या सर्वांगिण विकासावर भर दिला जाणार आहे. योजनांची अंमलबजावणी करून त्या योजना तळागाळातापर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न केले जातील. कालानुसार योजनांमध्ये असलेले बदल करून मागासवर्गीय घटकाला उभारी देण्याचा प्रयत्न केला जाईल असा संकल्प समाजकल्याण विभागाचे सह आयुक्त प्रमोद जाधव यांनी केला आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)